गोपनीय

क्रमांक : का.स./बैठक/२५७

**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण**
वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.
दिनांक : ४ एप्रिल, २०१८

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक ०३ मार्च, २०१८ रोजी झालेल्या २५७व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठवित आहे.

सचिव,
कार्यकारी समिती

**प्रति :**

मुख्य सचिव,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२. - अध्यक्ष

श्री. द. म. सुकथनकर
"प्रिया", वरळी सी फेस,
वरळी, मुंबई - ४०० ०१८. - सदस्य

श्री. ना. वि. मेराणी
ए/४७, आदर्श नगर,
वरळी, मुंबई - ४०० ०२५. - सदस्य

डॉ. शिरीष संख्ये
संचालक, मेकॅन्सी अँड कंपनी,
एक्सप्रेस टॉवर, २१ वा मजला,
नरिमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१. - सदस्य

अपर मुख्य सचिव,
गृहनिर्माण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२. - सदस्य

प्रधान सचिव (१),
नगर विकास विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२. - सदस्य

..२/-

महापालिका आयुक्त, - सदस्य
बृहन्मुंबई महानगरपालिका,
मुंबई - ४०० ००१.

व्यवस्थापकीय संचालक, - सदस्य
सिडको,
निर्मल, नरीमन पॉईंट,
मुंबई - ४०० ०२१.

महानगर आयुक्त - सदस्य
मुं. म. प्र. वि. प्राधिकरण

**निमंत्रित :**

अपर मुख्य सचिव,
वित्त विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

अपर मुख्य सचिव,
पर्यावरण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

अपर मुख्य सचिव (उद्योग),
उद्योग, उर्जा व कामगार विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रधान सचिव (२),
नगर विकास विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रधान सचिव (विशेष प्रकल्प),
सामान्य प्रशासन विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

**प्रत अग्रेषित :-**

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे अधिकारी

-----------xox----------

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीची २५७वी बैठक

**दिनांक :** ०३ मार्च, २०१८ (शनिवार)

**वेळ :** दुपारी ३.३० वाजता

**स्थळ :** मा.मुख्य सचिव यांचे समिती कक्ष,
सहावा मजला, मंत्रालय,
मुंबई – ४०० ०३२

**उपस्थित सदस्य :**

| | | |
|---|---|---|
| श्री. सुमीत मल्लिक<br>मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन | - | अध्यक्ष |
| डॉ. शिरिष संख्ये | - | सदस्य |
| श्री. संजय कुमार<br>अपर मुख्य सचिव,<br>गृहनिर्माण विभाग | - | सदस्य |
| श्री. नितीन करीर<br>प्रधान सचिव,<br>नगर विकास विभाग | - | सदस्य |
| श्री.यु.पी.एस. मदान<br>महानगर आयुक्त,<br>मुं.म.प्र.वि.प्राधिकरण | - | सदस्य |

**निमंत्रित :**

श्री. संजय खंदारे
अति.महानगर आयुक्त,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. संजय यादव
सह महानगर आयुक्त,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. पी. आर. के. मूर्ती
संचालक (प्रकल्प),
मेट्रो अंमलबजावणी शाखा
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. माधव नागरगोजे
वित्त सल्लागार,
वित्त व लेखा विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. रा. भा. गाडगे
मुख्य अभियंता,
अभियांत्रिकी विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. डी. टी. ठुबे
मुख्य अभियंता,
अभियांत्रिकी विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. दि. न. कवठकर
उप-महानगर आयुक्त (प्रशासन),
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. रा. म. गोटाफोडे
मुख्य लेखा अधिकारी,
वित्त व लेखा विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. संजय नानावटे
सचिव,
कार्यकारी समिती,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

बैठकीच्या सुरुवातीस, महानगर आयुक्त यांनी मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांचे स्वागत केले.

त्यानंतर, विषय पत्रिकेवरील बाबी विचारार्थ घेण्यात आल्या.

**<u>बाब क्र.१ :</u>** **<u>प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक २० डिसेंबर, २०१७ रोजी झालेल्या २५६व्या बैठकीचे कार्यवृत्त कायम करणे.</u>**

कार्यवृत्त कायम करण्यात आले.

**<u>बाब क्र.२ :</u>** **<u>प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक २० डिसेंबर, २०१७ रोजी झालेल्या २५६व्या बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल.</u>**

कार्यवाही अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**<u>बाब क्र.३ :</u>** **<u>मेट्रो मार्ग -४ (वडाळा – घाटकोपर – मुलुंड – ठाणे – कासारवडवली) या मेट्रो मार्गाच्या उन्नत मार्ग व स्थानकांच्या स्थापत्य बांधकामाकरीता पॅकेज क्र.८, पॅकेज क्र.९, पॅकेज क्र.१०, पॅकेज क्र.११ व पॅकेज क्र.१२ अंतर्गत मागविलेल्या ई-निविदांना मंजूरी देण्याबाबत.</u>**

३.१ महानगर आयुक्त यांनी सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना असे नमूद केले की, मेट्रो मार्ग क्र-२ब च्या चार पॅकेजसाठी (सी.ए.०४ ते सी.ए.०७) व मेट्रो मार्ग-४ च्या पाच पॅकेजसाठी (सी.ए.०८ ते सी.ए.१२) अशा एकूण नऊ पॅकेजसाठीच्या स्थापत्य बांधकामांकरीता जानेवारी, २०१७ मध्ये ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या. पात्र निविदाकारांचे वित्तीय लिफाफे (लिफाफा क-आर्थिक प्रस्ताव) उघडण्यात आल्यावर सर्व पॅकेजसाठी प्राप्त झालेले लघुत्तम देकार हे अंदाजपत्रकीय किंमतीपेक्षा सुमारे २४ ते २५ % अधिक दिले असल्याचे निदर्शनास आले. या मेट्रो स्थापत्य कामांसाठी सदर देकार जास्त दराचे असल्याने प्राधिकरणाने सर्व पॅकेजेससाठी फेर निविदा मागविण्याचा निर्णय घेण्यात आला. मेट्रो मार्ग-४ च्या पॅकेज क्र.८, पॅकेज क्र.९, पॅकेज क्र.१०, पॅकेज क्र.११ व पॅकेज क्र.१२ च्या स्थापत्य बांधकामाकरीता फेर ई-निविदा मागविण्यासाठी टाईम्स ऑफ इंडिया (सर्व आवृत्ती) महाराष्ट्र टाईम्स या वृत्तपत्रात दिनांक १९ नोव्हेंबर, २०१७ रोजी ई-निविदा सूचना प्रसिद्ध करण्यात आली. प्रचलित पद्धतीनुसार निविदा पूर्व बैठक घेवून उपस्थित केलेल्या बाबींचे स्पष्टीकरण व इतिवृत्त प्राधिकरणाच्या ई-निविदा संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आले होते. ई-निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक ९ जानेवारी, २०१८ होता व त्यास अनुसरुन सादर केलेल्या ई-निविदाकारांचा लिफाफा 'अ' (निविदा व इसारा किंमत) व 'ब' (तांत्रिक प्रस्ताव) दिनांक ११ जानेवारी, २०१८ रोजी दुपारी १२.०० वाजता ई-निविदाकारांच्या

प्रतिनिधी समक्ष उघडण्यात आला. उपरोक्त कामांसाठी खालील निविदाकारांकडून ई-निविदा सादर केल्या आहेत :-

| अ. क्र. | कंत्राटदारांचे नाव | ई निविदा सादर करण्यात आल्या | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | पॅकेज-सी.ए.८ | पॅकेज-सी.ए.९ | पॅकेज-सी.ए.१० | पॅकेज-सी.ए.११ | पॅकेज-सी.ए.१२ |
| १ | मे.एनसीसी लिमिटेड | √ | | √ | | √ |
| २ | मे.लार्सन अॅन्ड टुब्रो लि. | √ | √ | √ | √ | √ |
| ३ | मे.आर.इन्फ्रा-अस्टालडी (जे.व्ही.) | √ | √ | √ | √ | √ |
| ४ | मे. गॅमन इंजिनिअर्स अॅन्ड कॉन्ट्रक्टर्स | √ | | √ | | |
| ५ | मे. सी. एच. ई. सी.- टी. पी. एल. (जे.व्ही.) | | √ | √ | √ | √ |
| ६ | मे. जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्टस लि. | | √ | √ | √ | √ |
| ७ | मे. एच.सी.सी अॅन्ड सदभाव (जे.व्ही.) | | √ | √ | √ | √ |
| ८ | मे. आय.ई.सी.सी.एल. | | √ | √ | √ | √ |
| ९ | मे. एम. बी. झेड - जी. एच. व्ही. (जे.व्ही.) | | | | √ | √ |
| १० | मे. सुप्रीम इन्फ्रास्ट्रक्चर इंडिया लिमीटेड | | | | √ | |
| ११ | मे. जे.एम.सी.प्रोजेक्टस इंडिया लि. | | | | √ | √ |
| **एकूण** | | **०४** | **०६** | **०८** | **०९** | **०९** |

ई-निविदांच्या पात्रतेची व तांत्रिक छाननी मेट्रो मार्ग-४ प्रकल्पाच्या साधारण सल्लागार (General Consultant) मार्फत करण्यात येऊन त्याचा अहवाल प्राधिकरणास दिनांक ०५ फेब्रुवारी, २०१८ रोजी पॅकेज क्र.८, पॅकेज क्र.९, पॅकेज क्र.१०, पॅकेज क्र.१२ व दिनांक ०८ फेब्रुवारी, २०१८ रोजी पॅकेज क्र. ११ साठी खालीलप्रमाणे अहवाल सादर करण्यात आलेला आहे:-

**पॅकेज क्र. ८**

| अ.क्र | कंत्राटदारांचे नाव | पॅकेज-८ |
|---|---|---|
| १ | मे. एनसीसी लिमिटेड | पात्र |
| २ | मे. लार्सन अॅन्ड टुब्रो लि. | पात्र |
| ३ | मे. आर.इन्फ्रा-अस्टालडी (जे.व्ही.) | पात्र |
| ४ | मे. गॅमन इंजिनिअर्स अॅन्ड कॉन्ट्रक्टर्स | पात्र |
| | **एकूण** | **पात्र-४** |

**पॅकेज क्र. ९**

| अ.क्र | कंत्राटदारांचे नाव | पॅकेज-९ |
|---|---|---|
| १ | मे. लार्सन ॲन्ड टुब्रो लि. | पात्र |
| २ | मे. सी.एच.ई.सी.-टी.पी. एल.(जे.व्ही.) | पात्र |
| ३ | मे. आर.इन्फ्रा-अस्टालडी (जे.व्ही.) | पात्र |
| ४ | मे. जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्टस लि. | पात्र |
| ५ | मे. एच.सी.सी ॲन्ड सदभाव (जे.व्ही.) | पात्र |
| ६ | मे. आय.ई.सी.सी.एल. | पात्र |
| | **एकूण** | **पात्र-६** |

**पॅकेज क्र. १०**

| अ.क्र | कंत्राटदारांचे नाव | पॅकेज-१० |
|---|---|---|
| १ | मे. एनसीसी लिमीटेड | पात्र |
| २ | मे. लार्सन ॲन्ड टुब्रो लि. | पात्र |
| ३ | मे. सी.एच.ई.सी.-टी.पी. एल.(जे.व्ही.) | पात्र |
| ४ | मे. आर.इन्फ्रा-अस्टालडी (जे.व्ही.) | पात्र |
| ५ | मे. गॅमन इंजिनिअर्स ॲन्ड कॉन्ट्रॅक्टर्स | पात्र |
| ६ | मे. जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्टस लि. | पात्र |
| ७ | मे. एच.सी.सी ॲन्ड सदभाव (जे.व्ही.) | पात्र |
| ८ | मे. आय.ई.सी.सी.एल. | पात्र |
| | **एकूण** | **पात्र-८** |

**पॅकेज क्र. ११**

| अ.क्र | कंत्राटदारांचे नाव | पॅकेज-११ |
|---|---|---|
| १ | मे. लार्सन ॲन्ड टुब्रो लि. | पात्र |
| २ | मे. सी.एच.ई.सी.-टी.पी. एल.(जे.व्ही.) | पात्र |
| ३ | मे. आर.इन्फ्रा-अस्टालडी (जे.व्ही.) | पात्र |
| ४ | मे. एम.बी.झेड-जी.एच.व्ही. | पात्र |
| ५ | मे. जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्टस लि. | पात्र |
| ६ | मे. जे.एम.सी.प्रोजेक्टस इंडिया लि. | पात्र |
| ७ | मे. एच.सी.सी ॲन्ड सदभाव(जे.व्ही.) | पात्र |
| ८ | मे. आय.ई.सी.सी.एल. | पात्र |
| ९ | मे. सुप्रीम इन्फ्रास्ट्रक्चर इंडिया लिमीटेड | अपात्र |
| | **एकूण** | **पात्र-८,अपात्र-१** |

..६/-

**पॅकेज क्र. १२**

| अ.क्र | कंत्राटदारांचे नाव | पॅकेज-१२ |
|---|---|---|
| १ | मे. एनसीसी लिमीटेड | पात्र |
| २ | मे. लार्सन अॅन्ड टुब्रो लि. | पात्र |
| ३ | मे. सी.एच.ई.सी.-टी.पी. एल.(जे.व्ही.) | पात्र |
| ४ | मे. आर.इन्फ्रा-अस्टालडी (जे.व्ही.) | पात्र |
| ५ | मे. एम.बी.झेड-जी.एच.व्ही. | पात्र |
| ६ | मे. जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्टस लि. | पात्र |
| ७ | मे. जे.एम.सी.प्रोजेक्टस इंडिया लि. | पात्र |
| ८ | मे. एच.सी.सी अॅन्ड सदभाव(जे.व्ही.) | पात्र |
| ९ | मे. आय.ई.सी.सी.एल. | पात्र |
| | **एकूण** | **पात्र-९** |

तांत्रिकदृष्टया पात्र निविदाकारांचे वित्तीय लिफाफे (लिफाफा क -आर्थिक प्रस्ताव) पॅकेज क्र.८, पॅकेज क्र.९, पॅकेज क्र.१०, पॅकेज क्र.११ व पॅकेज क्र.१२ साठी दिनांक १२ फेब्रुवारी, २०१८ रोजी ई-निविदाकारांच्या प्रतिनिधी समक्ष उघडण्यात आले होते. तसेच उघडलेल्या सर्व ई-निविदांची छाननी मेट्रो मार्ग-४ प्रकल्पाचे साधारण सल्लागार यांच्या मार्फत करण्यात आली. साधारण सल्लागाराने दिनांक १४ फेब्रुवारी,२०१८ रोजी सादर केलेल्या निविदा छाननी अहवालानुसार निविदाकारांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे:-

**पॅकेज क्र. ८**

| अ.क्र | कंत्राटदारांचे नाव | निविदेची रक्कम (रु. कोटी) | प्राप्त देकार (रु. कोटी) | % कमी /अधिक (-)/(+) |
|---|---|---|---|---|
| १ | मे. एनसीसी लिमीटेड | ५१९.३६ | ५८५.११ | (+)१२.६६% |
| २ | मे. लार्सन अॅन्ड टुब्रो लि. | | ६३५.५० | (+)२२.३६% |
| ३ | **मे. आर.इन्फ्रा-अस्टालडी (जे.व्ही.)** | | **५४०.००** | **(+)३.९७% (L1)** |
| ४ | मे. गॅमन इंजिनिअर्स अॅन्ड कॉन्ट्रॅक्टर्स | | ५६५.८३ | (+)८.९५% |

**पॅकेज क्र. ९**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | मे. लार्सन ॲन्ड टुब्रो लि. | ५४६.०८ | ६०८.५० | (+)११.४३% |
| २ | **मे. सी.एच.ई.सी.-टी.पी. एल.(जे.व्ही.)** | | **५३८.०३** | **(-)१.४७%(L1)** |
| ३ | मे. आर.इन्फ्रा-अस्टालडी (जे.व्ही.) | | ५७६.०० | (+)५.४८% |
| ४ | मे. जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्टस लि. | | ५९४.७६ | (+)८.९१% |
| ५ | मे. एच.सी.सी ॲन्ड सदभाव(जे.व्ही.) | | ६३०.५७ | (+)१५.४७% |
| ६ | मे. आय.ई.सी.सी.एल. | | ६०१.९२ | (+)१०.२३% |

**पॅकेज क्र. १०**

| अ.क्र | कंत्राटदारांचे नाव | निविदेची रक्कम (रु. कोटी) | प्राप्त देकार (रु. कोटी) | % कमी /अधिक (-)/(+) |
|---|---|---|---|---|
| १ | मे. एनसीसी लिमीटेड | ५३५.०७ | ५९३.९३ | (+)११.००% |
| २ | मे. लार्सन ॲन्ड टुब्रो लि. | | ५८५.१० | (+)९.३५% |
| ३ | मे. सी.एच.ई.सी.-टी.पी. एल.(जे.व्ही.) | | ५२६.९५ | (-)१.५२% |
| ४ | **मे. आर.इन्फ्रा-अस्टालडी (जे.व्ही.)** | | **५१३.००** | **(-)४.१२%(L1)** |
| ५ | मे. गॅमन इंजिनिअर्स ॲन्ड कॉन्ट्रक्टर्स | | ५४८.०४ | (+)२.४२% |
| ६ | मे. जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्टस लि. | | ५६१.५७ | (+)४.९५% |
| ७ | मे. एच.सी.सी ॲन्ड सदभाव(जे.व्ही.) | | ५६६.९४ | (+)५.९६% |
| ८ | मे. आय.ई.सी.सी.एल. | | ५९९.४१ | (+)१२.०२% |

**पॅकेज क्र. ११**

| अ.क्र | कंत्राटदारांचे नाव | निविदेची रक्कम (रु. कोटी) | प्राप्त देकार (रु. कोटी) | % कमी /अधिक (-)/(+) |
|---|---|---|---|---|
| १ | मे. लार्सन ॲन्ड टुब्रो लि. | ५२९.६७ | ५९२.३० | (+)११.८२% |
| २ | **मे. सी.एच.ई.सी.-टी.पी. एल.(जे.व्ही.)** | | **५१०.२२** | **(-)३.६७%(L1)** |
| ३ | मे. आर.इन्फ्रा-अस्टालडी (जे.व्ही.) | | ५१३.०० | (-)३.१५% |
| ४ | मे. एम.बी.झेड-जी.एच.व्ही. | | ५३४.९१ | (+)०.९९% |
| ५ | मे. जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्टस लि. | | ५६४.०२ | (+)६.४८% |
| ६ | मे. जे.एम.सी.प्रोजेक्टस इंडिया लि. | | ५६०.८५ | (+)५.८९% |
| ७ | मे. एच.सी.सी ॲन्ड सदभाव(जे.व्ही.) | | ५५८.५७ | (+)५.४६% |
| ८ | मे. आय.ई.सी.सी.एल. | | ६११.९९ | (+)१५.५४% |

**पॅकेज क्र.१२**

| अ. क्र | कंत्राटदारांचे नाव | निविदेची रक्कम (रु. कोटी) | प्राप्त देकार (रु. कोटी) | % कमी /अधिक (-)/(+) |
|---|---|---|---|---|
| १ | मे. एनसीसी लिमीटेड | ५४७.६३ | ५९६.४२ | (+)८.९१% |
| २ | मे. लार्सन अॅन्ड टुब्रो लि. | | ६११.२० | (+)११.६१% |
| ३ | मे. सी.एच.ई.सी.-टी.पी. एल.(जे.व्ही.) | | ५३४.७७ | (-)२.३५% |
| ४ | **मे. आर.इन्फ्रा-अस्टालडी (जे.व्ही.)** | | **५३१.००** | **(-)३.०४%(L1)** |
| ५ | मे. एम.बी.झेड-जी.एच.व्ही. | | ५५४.५३ | (+)१.२६% |
| ६ | मे. जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्टस लि. | | ५८५.५९ | (+)६.९३% |
| ७ | मे. जे.एम.सी.प्रोजेक्टस इंडिया लि. | | ५७३.६४ | (+)४.७५% |
| ८ | मे. एच.सी.सी अॅन्ड सदभाव(जे.व्ही.) | | ५९४.६९ | (+)८.५९% |
| ९ | मे. आय.ई.सी.सी.एल. | | ६११.५६ | (+)११.६७% |

महानगर आयुक्त यांनी असेही नमूद केले की, सदर लघुत्तम कंत्राटदार निविदेतील सर्व अटींचे अनुपालन करणारे व रास्त असून साधारण सल्लागार यांनी सादर केलेल्या अहवालानुसार लघुत्तम निविदांकारांचा देकार पुढीलप्रमाणे आहेत :-

| पॅकेज क्र. | कंत्राटदाराचे नाव | निविदेची रक्कम (रु. कोटी) | प्राप्त लघुत्तम देकार (रु. कोटी) | % कमी /अधिक (-)/(+) |
|---|---|---|---|---|
| पॅकेज-०८ | मे. आर.इन्फ्रा-अस्टालडी (जे.व्ही.) | ५१९.३६ | ५४०.०० | (+)३.९७% |
| पॅकेज-०९ | मे. सी.एच.ई.सी.-टी.पी. एल.(जे.व्ही.) | ५४६.०८ | ५३८.०३ | (-)१.४७% |
| पॅकेज-१० | मे. आर.इन्फ्रा-अस्टालडी (जे.व्ही.) | ५३५.०७ | ५१३.०० | (-)४.१२% |
| पॅकेज-११ | मे. सी.एच.ई.सी.-टी.पी. एल.(जे.व्ही.) | ५२९.६७ | ५१०.२२ | (-)३.६७% |
| पॅकेज-१२ | मे. आर.इन्फ्रा-अस्टालडी (जे.व्ही.) | ५४७.६३ | ५३१.०० | (-)३.०४% |

३.२ त्यानंतर महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, अति. महानगर आयुक्त/प्रकल्प संचालक यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या निविदा शिफारस समितीमध्ये (१) संचालक (प्रकल्प)-मेट्रो (२) वित्तीय सल्लागार (३) प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग (४) मुख्य अभियंता (नागरी प्रशिक्षण संस्था व संशोधन केंद्र), बृहन्मुंबई महानगरपालिका यांचा समावेश आहे. मेट्रो मार्ग-४ प्रकल्पाचे साधारण सल्लागार यांनी सादर केलेला तांत्रिक व आर्थिक छाननी अहवाल सदर निविदा शिफारस समितीपुढे मान्यतेसाठी दिनांक १४ फेब्रुवारी, २०१८ रोजी आयोजित केलेल्या बैठकीत सादर करण्यात आला. निविदा शिफारस समितीने दिनांक १४ फेब्रुवारी, २०१८ रोजीच्या बैठकीत साधारण सल्लागार यांनी सादर केलेल्या अहवालाचा विचार करून असे निदर्शनास आणले की, केंद्र शासनाच्या दिनांक २५ जानेवारी, २०१८ रोजीच्या अधिसूचना क्र. १/२०१८-Central Tax (Rate) अन्वये व GST Council च्या दिनांक १८ जानेवारी, २०१८ रोजी झालेल्या बैठकीत ठरल्याप्रमाणे मेट्रो बांधकामांसाठी GST चे दर १८% हून १२% असे कमी करण्यात आले आहेत. त्यामुळे या कमी झालेल्या GST च्या दराच्या अनुषंगाने व निविदेतील तरतुदींच्या अनुषंगाने सर्व लघुत्तम कंत्राटदारांकडून सुधारित देकार प्राप्त करुन घेण्याच्या सुचना निविदा शिफारस समितीने दिल्या.

३.३ महानगर आयुक्त यांनी पुढे असे नमूद केले की, कायद्यांमध्ये बदल झाल्यास, निविदेतील तरतुदींप्रमाणे कंत्राटीय किंमतीमध्ये सुधारणा करण्यात येईल. महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, वस्तू आणि सेवा करातील कमी झालेल्या दरानुसार सर्व लघुत्तम निविदाकारांकडून सुधारित देकार देण्याबाबत तिन वेळा निविदा शिफारस समितीच्या बैठकी झाल्या. पाचही पॅकेजमध्ये लघुत्तम निविदाकारांकडून वेगवेगळया दराने घट प्रस्तावित केल्यामुळे या संदर्भात लघुत्तम निविदाकारांनी GST संदर्भात कमी झालेल्या दरांच्या अनुषंगाने सक्षम GST प्राधिकरणाचा निर्णय अंतिम असेल व त्यांना बंधनकारक असेल अशा स्वरुपाचे हमी पत्र प्राप्त करुन घेण्याच्या अटीस अधिन राहून लघुत्तम देकार स्विकारण्याची शिफारस समितीने केली.

३.४ महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, मे. सुप्रीम इन्फ्रास्ट्रक्चर हे तांत्रिक छाननीच्या निकषानुसार पात्र न ठरल्याने त्यांचा आर्थिक प्रस्ताव उघडण्यात आलेला नाही.त्यावर, त्यांनी पॅकेज CA-११ करता मा.उच्च न्यायालय, बॉम्बे येथे रिट याचिका दाखल केली आहे. तसेच सदर याचिकेची प्रथम सुनावणी दिनांक २३ फेब्रुवारी, २०१८ रोजी झालेली असुन त्यादिवशी

मा. उच्च न्यायालय, बॉम्बे ह्यांनी निविदा प्रक्रियेवर कुठल्याही प्रकारची स्थगिती दिलेली नाही. मात्र मा. उच्च न्यायालय, बॉम्बे यांनी पुढीलप्रमाणे निर्देश दिले आहेत. "Any steps taken during the pendency of these petitions shall be subject to the outcome of these petitions". या प्रस्तावावर चर्चा करताना मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी मे.सुप्रीम इन्फ्रास्ट्रक्चर इंडिया लि. या निविदाकारास अपात्र का ठरविण्यात आले अशी विचारणा केली. यावर खुलासा करताना महानगर आयुक्त यांनी पुढीलप्रमाणे अवगत केले.

३.४.१ पॅकेज ११ करीता मे.सुप्रीम इन्फ्रास्ट्रक्चर इंडिया लि. यांनी सादर केलेल्या निविदेमध्ये, निविदा पात्रतेनुसार कामाचा पुरेसा अनुभव नसल्याचे दिसून आले. मे. सुप्रीम इन्फ्रास्ट्रक्चर इंडिया लि. यांनी लूधियाना सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कामाचे अनुभव प्रमाणपत्र सादर केले असून सदर काम हे त्यांनी जॉईट व्हेंचर मध्ये केले आहे. लूधियाना, सार्वजनिक बांधकाम विभागाने दिलेल्या प्रमाणपत्रामध्ये मे.सुप्रीम इन्फ्रास्ट्रक्चर इंडिया लि. यांनी ९०% काम केल्याचे नमुद केले आहे. परंतू प्रस्तूत कामाच्या निविदा तरतूदीनुसार जर कामाच्या अनुभवासंदर्भात सादर केलेले काम हे निविदाकाराने जॉईट व्हेंचर मध्ये केले असेल, तर त्या जॉईट व्हेंचर मध्ये निविदाकाराच्या सहभागाच्या टक्केवारीच्या प्रमाणात येणाऱ्या प्रकल्प किंमतीचाच विचार अर्हतेसाठी करणे क्रमप्राप्त आहे. मे.सुप्रीम इन्फ्रास्ट्रक्चर इंडिया लि. यांनी कामाच्या अनुभवासंदर्भात सादर केलेले काम हे तीन कंपन्या मिळून जॉईट व्हेंचर मध्ये केले असल्यामुळे सदर कामामधील त्यांच्या सहभागीत्व टक्केवारीच्या प्रमाणात, म्हणजेच फक्त २६% काम अर्हतेच्या अटीकरिता विचारात घेणे शक्य असल्याचे व त्यामुळे ते कामाच्या अनुभवासंदर्भातील अर्हतेच्या निकषात बसत नाही.

३.४.२ मे.सुप्रीम इन्फ्रास्ट्रक्चर इंडिया लि. यांना नवी मुंबई मेट्रो प्रकल्पांतर्गत सिडकोने दोन कामे दिलेली होती. मात्र त्यांची कामे संथगतीने होत असल्यामुळे तद्नंतर सिडकोने ही दोन्ही दिलेली कामे रद्द (Terminate) केलेली आहेत. गत ३ वर्षांच्या कालावधीत कोणत्याही Metro Organisation कडून निविदाकाराकडील कामे रद्द केली असल्यास सदर निविदाकार अपात्र ठरतात, अशी अट प्रस्तूत कामाच्या निविदे अंतर्गत असल्यामुळे मे. सुप्रीम इन्फ्रास्ट्रक्चर इंडिया लि. यांची निविदा आवश्यक निकषात बसत नसल्याचे

ठरविण्यात आले. मे.सुप्रीम इन्फ्रास्ट्रक्चर इंडिया लि. यांनी सिडको ही Metro Organisation नसल्याचा युक्तिवाद प्राधिकरणाकडे केला आहे. परंतू नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या दिनांक ०६ ऑक्टोबर, २०१० च्या आदेशानुसार नवी मुंबई मेट्रो प्रकल्प राबवण्याकरीता सिडकोला प्राधिकृत केले असल्यामुळे "CIDCO is not a Metro Organization" असे म्हणणे योग्य ठरणार नाही.

३.४.३ सद्य:स्थितीत प्राधिकरणाअंतर्गत मे.सुप्रीम इन्फ्रास्ट्रक्चर इंडिया लि. यांची तीन कामे सुरू असून या तीनही कामांची प्रगती त्यांची आर्थिक परिस्थिती बिकट असल्यामुळे समाधानकारक नाही.

उपरोक्त नमूद कारणांमुळे मे.सुप्रीम इन्फ्रास्ट्रक्चर इंडिया लि.यांची निविदा तांत्रिकदृष्टया पुरेशी प्रतिसादात्मक नसल्याचे (substantially non-responsive) ठरविण्यात आले व पुढील निविदा प्रक्रियेत त्यांना अपात्र ठरविण्यात आले.

३.५ निविदा सादर करण्याच्या अंतिम दिनांकानंतर केंद्र शासनाने दिनांक २५ जानेवारी, २०१८ च्या अधिसूचनेद्वारे मेट्रो बांधकामांकरिता वस्तू व सेवा कराचा दर १८% वरुन १२% असा कमी केला असल्याची बाब महानगर आयुक्त यांनी अवगत केली. त्याचा परिणाम म्हणून निविदाकारांनी सादर केलेला लघुत्तम देकार हा त्या प्रमाणात कमी करण्याची गरज निदर्शनास आणून देण्यात आली. यासंदर्भात उपायुक्त वस्तू व सेवा कर यांच्यासोबत २६ फेब्रुवारी, २०१८ रोजी झालेल्या बैठकीत सविस्तरपणे सर्वांगिण चर्चा करण्यात आली. या चर्चेनुसार उपायुक्त वस्तू व सेवा कर यांच्याकडून यासंदर्भात स्पष्टीकरणात्मक मार्गदर्शन घेण्याचे ठरले. त्यानुसार दिनांक ०१ मार्च, २०१८ रोजीच्या पत्रान्वये सध्याचा वस्तु व सेवा कर गृहीत धरुन निविदाकारांनी सादर केलेले लघुत्तम देकार, वस्तू व सेवा कराचे दर ६% नी कमी झाल्याने त्याच्या समतुल्य ५.०८ % इतक्या प्रमाणात कमी करणे अपेक्षित असल्याचे कळविले आहे. त्यानुसार निविदा रक्कम कमी करुन लघुत्तम निविदाकारास स्वीकृति पत्र देण्यात यावे असे प्रस्तावित आहे.

**निर्णय :** **सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र. १३४४ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्रधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करून कार्यकारी समिती याद्वारे पॅकेज - ८ साठी मे. रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि.- अस्टालडी (जे.व्ही) यांच्या रू. ५४०.०० कोटी रक्कमेच्या मूळ लघुत्तम देकाराची, पॅकेज-९ साठी मे. टाटा प्रोजेक्टस लि.-चायना हार्बर इजिंनिअरींग कंपनी (जे.व्ही.) यांच्या रू.५,३८,०२,९६,९४३ रक्कमेच्या मूळ लघुत्तम देकाराची, पॅकेज - १० साठी मे. रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि.- अस्टालडी (जे.व्ही) यांच्या रू. ५१३.०० कोटी रक्कमेच्या मूळ लघुत्तम देकाराची, पॅकेज-११ साठी मे. टाटा प्रोजेक्टस लि.-चायना हार्बर इजिंनिअरींग कंपनी (जे.व्ही.) यांच्या रु. ५,१०,२२,३१,६१५ रक्कमेच्या मूळ लघुत्तम देकाराची आणि पॅकेज-१२ साठी मे.रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि.- अस्टालडी (जे.व्ही) यांच्या रु. ५३१.०० कोटी रक्कमेच्या मूळ लघुत्तम देकाराची, वस्तू व सेवा कराच्या किंवा इतर करांच्या दरामध्ये निविदा प्राप्त होण्याच्या दिनांकापासून आतापर्यंत झालेले बदल व कंत्राटीय कालावधीत आणखी बदल झाल्यास कंत्राटीय तरतूदीनुसार कंत्राटीय किंमतीमध्ये वेळोवेळी योग्य ते समायोजन करण्याच्या अधिन राहून, तसेच GST संदर्भात सक्षम प्राधिकरणाच्या प्राप्त अभिप्रायानुसार लघुत्तम निविदाकारांनी सादर केलेल्या मूळ देकारास ५.०८% नी कमी करुन स्विकृती पत्र देण्याच्या कार्यवाहीस मान्यता देण्यात येत आहे. तसेच या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या करारनाम्यातील अटीप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येतो की,** मे. सुप्रीम इन्फ्रास्ट्रक्चर इंडिया लि. यांच्या याचिकेवर पॅकेज क्र. ११ संदर्भात उच्च न्यायालयाचा जो आदेश येईल त्याची अंमलबजावणी करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे.

**"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.४ : मेट्रो मार्ग -२ ब (डी. एन. नगर – मंडाळे) या मेट्रो मार्गाच्या उन्नत मार्ग व स्थानकांच्या स्थापत्य बांधकामाकरीता पॅकेज क्र.६ व पॅकेज क्र.७ अंतर्गत मागविलेल्या ई-निविदांना मंजूरी देण्याबाबत.**

४.१ महानगर आयुक्त यांनी सदर प्रस्तावाबाबत माहिती देतानाअसे सांगितले की, मेट्रो मार्ग-४ व २ब च्या नऊ पॅकेजसाठी (सी. ए. ०४ ते सी. ए.१२) च्या स्थापत्य बांधकामांकरीता फेर ई-निविदा जानेवारी, २०१७ मध्ये मागविण्यात आल्या. पात्र निविदाकारांचे वित्तीय लिफाफे (लिफाफा-क) उघडण्यात आल्यावर सर्व पॅकेजसाठी प्राप्त झालेले लघुत्तम देकार हे अंदाजपत्रकीय किंमतीपेक्षा सुमारे २४ ते २५% अधिक दिले असल्याचे निदर्शनास आले. या मेट्रो स्थापत्य कामांसाठी सदर देकार जास्त दराचे असल्याने प्राधिकरणाने फेर निविदा मागविण्याचा निर्णय घेतला. त्याअनुषंगाने प्रथम मेट्रो मार्ग - ४ व २ब च्या नऊ पॅकेजपैकी मेट्रो मार्ग-२ब च्या पॅकेज सी. ए. ०४ व सी. ए. ०५ ह्या दोन पॅकेज मधील कामाची व्याप्ती एकत्र करुन संयुक्त पॅकेज सी. ए. ०४R, या पॅकेज साठी फेर निविदा मागविण्याचा निर्णय घेण्यात आला. मेट्रो मार्ग-२ब च्या पॅकेज क्र.०६ व पॅकेज क्र.०७ च्या स्थापत्य बांधकामांकरीता ई-निविदा मागविण्यासाठी टाईम्स ऑफ इंडिया (सर्व आवृत्ती), महाराष्ट्र टाईम्स, नवभारत टाईम्स व इकॉनॉमिक टाईम्स या वृत्तपत्रांत दिनांक १९ नोव्हेंबर, २०१७ रोजी ई-निविदा सूचना प्रसिध्द करण्यात आली. प्रचलित पध्दतीनुसार निविदा पूर्व बैठक घेवून उपस्थित केलेल्या बाबींचे स्पष्टीकरण व इतिवृत्त प्राधिकरणाच्या ई-निविदा संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले होते. ई-निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक १६ जानेवारी, २०१८ होता व त्यास अनुसरुन सादर केलेल्या ई-निविदाकारांचा लिफाफा 'अ' (निविदा व इसारा किंमत) व 'ब' (तांत्रिक प्रस्ताव) दिनांक १८ जानेवारी, २०१८

रोजी सकाळी ११.०० वाजता ई-निविदाकारांच्या प्रतिनिधी समक्ष उघडण्यात आला. उपरोक्त कामांसाठी खालील निविदाकारांनी ई-निविदा सादर केल्या आहेत :-

**पॅकेज क्र. ०६**

| अ.क्र. | कंत्राटदारांचे नाव |
|---|---|
| १ | मे. एल ॲण्ड टी लि. |
| २ | मे.एम.बी.झेड व मे. आर.सी.सी. (जे.व्ही.) |
| ३ | मे. सिंप्लेक्स इन्फ्रा. लि. |
| ४ | मे. सुप्रिम इन्फ्रास्ट्रक्चर इंडिया लि. |
| ५ | मे. एच.सी.सी. व मे. सदभाव लि. (जे.व्ही.) |
| ६ | मे. सी.एच.ई.सी.एल. व मे. टी.पी.एल. (जे.व्ही.) |

**पॅकेज क्र. ०७**

| अ.क्र. | कंत्राटदारांचे नाव |
|---|---|
| १ | मे. एल ॲण्ड टी लि. |
| २ | मे. सिंप्लेक्स इन्फ्रा. लि. |
| ३ | मे. सुप्रिम इन्फ्रास्ट्रक्चर लि. व मे. महाविर रोड्स ॲड इन्फ्रास्ट्रक्चर लि. (जे.व्ही.) |
| ४ | मे. जे. एम.सी. प्रोजेक्टस इंडिया लि. |
| ५ | मे. जी.जी.वाय.एच. बी.सी.एल., मे. निरज सिमेंट स्ट्रक्चरल लि. व मे. पी.के. एच. एस. प्रा . लि. (जे.व्ही.) |
| ६ | मे. एच.सी.सी. व मे. सदभाव लि. (जे.व्ही.) |
| ७ | मे. सी.एच.ई.सी.एल. व मे. टी.पी.एल. (जे.व्ही.) |
| ८ | मे.एम.बी.झेड लि. व मे. आर.सी.सी. लि. (जे.व्ही.) |

ई-निविदांच्या पात्रतेची व तांत्रिक छाननी मेट्रो मार्ग-२ब प्रकल्पाचे साधारण सल्लागार यांच्या मार्फत करण्यात येऊन त्यांचा अहवाल प्राधिकरणास दिनांक ०१ फेब्रुवारी, २०१८ रोजी

सादर करण्यात आला. सदर अहवालानुसार निविदाकारांचा पात्र/अपात्रतेचा तपशिल खालीलप्रमाणे आहे :-

**पॅकेज क्र. ०६**

| अ.क्र. | कंत्राटदारांचे नाव | पात्र/ अपात्र |
|---|---|---|
| १ | मे. एल अॅण्ड टी लि. | पात्र |
| २ | मे.एम.बी.झेड व मे. आर.सी.सी. (जे.व्ही.) | पात्र |
| ३ | मे. सिंप्लेक्स इंफ्रा. लि. | पात्र |
| ४ | मे. सुप्रिम इंफ्रास्ट्रक्चर इंडिया लि. | अपात्र |
| ५ | मे. एच.सी.सी. व मे. सदभाव लि. (जे.व्ही.) | पात्र |
| ६ | मे. सी.एच.ई.सी.एल. व मे. टी.पी.एल. (जे.व्ही.) | पात्र |
| | **एकूण** | **पात्र-५,अपात्र-१** |

**पॅकेज क्र. ०७**

| अ.क्र. | कंत्राटदारांचे नाव | पात्र/ अपात्र |
|---|---|---|
| १ | मे. एल अॅण्ड टी लि. | पात्र |
| २ | मे. सिंप्लेक्स इंफ्रा. लि. | पात्र |
| ३ | मे. सुप्रिम इंफ्रास्ट्रक्चर लि. व मे. महाविर रोड्स अॅड इंफ्रास्ट्रक्चर लि. (जे.व्ही.) | अपात्र |
| ४ | मे. जे. एम.सी. प्रोजेक्टस इंडिया लि. | पात्र |
| ५ | मे. जी.जी.वाय.एच. बी.सी.एल., मे. निरज सिमेंट स्ट्रक्चरल लि. व मे. पी.के. एच. एस. प्रा . लि. (जे.व्ही.) | पात्र |
| ६ | मे. एच.सी.सी. व मे. सदभाव लि. (जे.व्ही.) | पात्र |
| ७ | मे. सी.एच.ई.सी.एल. व मे. टी.पी.एल. (जे.व्ही.) | पात्र |
| ८ | मे.एम.बी.झेड लि. व मे. आर.सी.सी. लि. (जे.व्ही.) | पात्र |
| | **एकूण** | **पात्र-७,अपात्र-१** |

तांत्रिकदृष्टया पात्र निविदाकारांचे वित्तीय लिफाफे (लिफाफा क - आर्थिक प्रस्ताव) पॅकेज क्र. ०६ व पॅकेज क्र. ०७ साठी दिनांक १२ फेब्रुवारी, २०१८ रोजी ई-निविदाकारांच्या प्रतिनिधी समक्ष उघडण्यात आले होते. उघडलेल्या सर्व ई-निविदांची छाननी मेट्रो मार्ग-२ ब प्रकल्पाचे

..१६/-

साधारण सल्लागार मार्फत यांच्या करण्यात आली. सल्लागाराने दिनांक १४ फेब्रुवारी, २०१८ रोजी सादर केलेल्या निविदा छाननी अहवालानुसार तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे:-

**पॅकेज क्र. ०६**

| अ. क्र | कंत्राटदारांचे नाव | निविदेची रक्कम (रु. कोटी) | प्राप्त देकार (रु. कोटी) | % कमी /अधिक (-)/(+) |
|---|---|---|---|---|
| १ | मे. एल ॲण्ड टी लि. | ४८३.०५४ | ६१८,७६,००,०००/- | +२८.०९ |
| **२** | **मे.एम.बी.झेड व मे. आर.सी.सी. (जे.व्ही.)** | | **५२१,२१,२१,१११/-** | **+७.९० (L१)** |
| ३ | मे. सिंप्लेक्स इंफ्रा. लि. | | ६६५,१९,६४,३१८/- | +३७.७१ |
| ४ | मे. एच.सी.सी. व मे. सदभाव लि. (जे.व्ही.) | | ५७६,००,२९,३७०/- | +१९.२४ |
| ५ | मे. सी.एच.ई.सी.एल. व मे. टी.पी.एल. (जे.व्ही.) | | ६२७,५५,७३,४१५/- | +२९.९१ |

**पॅकेज क्र. ०७**

| अ. क्र | कंत्राटदारांचे नाव | निविदेची रक्कम (रु. कोटी) | प्राप्त देकार (रु. कोटी) | % कमी /अधिक (-)/(+) |
|---|---|---|---|---|
| १ | मे. एल ॲण्ड टी लि. | ४२०.०८ | ५१४,०९,००,०००/- | +२२.३८ |
| २ | मे. सिंप्लेक्स इंफ्रा. लि. | | ५४६,४५,१४,६२९/- | +३०.०८ |
| ३ | मे. जे. एम.सी. प्रोजेक्टस इंडिया लि. | | ४२४,०६,०४,१९६/- | +०.९५ |
| ४ | **मे. जी.जी.वाय.एच. बी.सी.एल., मे. निरज सिमेंट स्ट्रक्चरल लि. व मे. पी.के. एच. एस. प्रा . लि. (जे.व्ही.)** | | **३९३,०१,००,०००/-** | **-६.४४ (L१)** |
| ५ | मे. एच.सी.सी. व मे. सदभाव लि. (जे.व्ही.) | | ४८६,१८,८२,७३४/- | +१५.७४ |
| ६ | मे. सी.एच.ई.सी.एल. व मे. टी.पी.एल. (जे.व्ही.) | | ४९३,९५,९९,४९८/- | +१७.५९ |
| ७ | मे.एम.बी.झेड लि. व मे. आर.सी.सी. लि. (जे.व्ही.) | | ४२१,४१,३१,१११/- | +०.३२ |

४.२ महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, वरील लघुत्तम कंत्राटदार निविदेतील सर्व अटींचे अनुपालन करणारे, व रास्त असून साधारण सल्लागार यांनी सादर केलेल्या अहवालानुसार लघुत्तम निविदाकारांचा देकार पुढीलप्रमाणे आहे :-

| पॅकेज क्र. | कंत्राटदारांचे नाव | निविदेची रक्कम (रु. कोटी) | प्राप्त देकार (रु.कोटी) | % कमी /अधिक(-/+) |
|---|---|---|---|---|
| पॅकेज - ०६ | मे.एम.बी.झेड व मे. आर.सी.सी. (जे.व्ही.) | ४८३.०५४ | ५२१.२१ | +७.९० |
| पॅकेज - ०७ | मे. जी.जी.वाय.एच. बी.सी.एल., मे. निरज सिमेंट स्ट्रक्चरल लि. व मे. पी.के. एच. एस. प्रा . लि. (जे.व्ही.) | ४२०.०८ | ३९३.०१ | -६.४४ |

४.३ महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, अति. महानगर आयुक्त/प्रकल्प संचालक यांचा अध्यक्ष, (१) संचालक (प्रकल्प) -मेट्रो (२) वित्तीय सल्लागार (३) प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग (४) मुख्य अभियंता, (नागरी प्रशिक्षण संस्था व संशोधन केंद्र), बृहन्मुंबई महानगरपालिका यांचा समावेश आहे. मेट्रो मार्ग-२ब प्रकल्पाचे साधारण सल्लागार यांचा तांत्रिक व आर्थिक छाननी अहवाल सदर निविदा शिफारस समितीपुढे मान्यतेसाठी सादर करण्यात आला. निविदा शिफारस समितीने दिनांक १४ फेब्रुवारी, २०१८ रोजीच्या बैठकीत मेट्रो मार्ग-२ब प्रकल्पाचे साधारण सल्लागार यांनी सादर केलेल्या अहवालाचा विचार करून असे निदर्शनास आणले की, केंद्र शासनाच्या दिनांक २५ जानेवारी, २०१८ रोजीच्या अधिसूचना क्र. १/२०१८- Central Tax (Rate) अन्वये व GST Council च्या दिनांक १८ जानेवारी, २०१८ रोजी झालेल्या बैठकीत ठरल्याप्रमाणे मेट्रो बांधकामांसाठी GST चे दर १८% हून १२% असे कमी करण्यात आले आहे. त्यामुळे या कमी झालेल्या GST च्या दराच्या अनुषंगाने व निविदेतील तरतुदींच्या अनुषंगाने सर्व लघूत्तम कंत्राटदारांकडून सुधारित देकार प्राप्त करुन घेण्याच्या सुचना निविदा शिफारस समितीने दिल्या.

४.४ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, कायद्यांमध्ये बदल झाल्यास, निविदेतील तरतूदींप्रमाणे कंत्राटीय किंमतीमध्ये सुधारणा करण्यात येईल. महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, वस्तू आणि सेवा करातील कमी झालेल्या दरानुसार सर्व लघुत्तम निविदाकारांकडून सुधारित देकार देण्याबाबत तीन वेळा निविदा शिफारस समितीच्या बैठकी झाल्या. पाचही

पॅकेजमध्ये लघुत्तम निविदाकारांकडून वेगवेगळया दराने घट प्रस्तावित केल्यामुळे या संदर्भात लघुत्तम निविदाकारांनी GST संदर्भात कमी झालेल्या दरांच्या अनुषंगाने सक्षम GST प्राधिकरणाचा निर्णय अंतिम असेल व त्यांना बंधनकारक असेल अशा स्वरुपाचे हमी पत्र प्राप्त करुन घेण्याच्या अटीस अधिन राहून लघुत्तम देकार स्विकारण्याची शिफारस समितीने केली आहे.

४.५ कार्यकारी समितीचे सदस्य श्री. नितीन करीर, प्रधान सचिव, नगर विकास विभाग यांनी अशी विचारणा केली की, मेट्रो मार्गिका-२ब मधील पॅकेज CA-०६ साठी प्राप्त झालेला लघुत्तम देकार हा अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७.९०% जास्त रक्कमेचा प्राप्त झाला याचे कारण काय असू शकेल. त्यावर महानगर आयुक्तांनी असे सांगितले की, ह्या पॅकेजमध्ये कुर्ला येथे सेंट्रल व हार्बर अशा दोन रेल्वे क्रॉसींग व मिठी नदी क्रॉसींग असून, मेट्रो मार्गिका पुर्व द्रुतगती मार्गावरील कुर्ला उड्डाणपुलावरुन बांधकाम इ. कारणास्तव निविदाकाराने जास्त दराचा देकार दिलेला आहे. तसेच मेट्रो बांधकाम अरुंद व जास्त वाहतूकीच्या रस्त्यावर करावयाचे असल्याकारणाने सदर पॅकेज मध्ये जोखिम जास्त असल्याने निविदाकाराने लघुत्तम देकार अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त आले असावे.

४.६ महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मे.सुप्रीम इन्फ्रास्ट्रक्चर हे तांत्रिक छाननीच्या निकषानुसार पात्र न ठरल्याने, त्यांचा आर्थिक प्रस्ताव उघडण्यात आलेला नाही. सबब त्यांनी पॅकेज CA-०६ करीता मा. उच्च न्यायालय, बॉम्बे येथे रिट याचिका दाखल केली आहे. तसेच सदर याचिकेची प्रथम सुनावणी दिनांक २३ फेब्रुवारी, २०१८ रोजी झालेली असुन त्यादिवशी मा. उच्च न्यायालय, बॉम्बे ह्यांनी निविदा प्रक्रियेवर कुठल्याही प्रकारची स्थगिती दिलेली नाही. मात्र मा. उच्च न्यायालय, बॉम्बे यांनी पुढीलप्रमाणे निर्देश दिले आहेत. “Any steps taken during the pendency of these petitions shall be subject to the outcome of these petitions.”

या प्रस्तावावर चर्चा करताना मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी मे.सुप्रीम इन्फ्रास्ट्रक्चर इंडिया लि. या निविदाकारास अपात्र का ठरविण्यात आले अशी विचारणा केली. यावर खुलासा करताना महानगर आयुक्त यांनी पुढीलप्रमाणे अवगत केले :-

४.६.१ पॅकेज ६ करीता मे.सुप्रीम इन्फ्रास्ट्रक्चर इंडिया लि. यांनी सादर केलेल्या निविदेमध्ये, निविदा पात्रतेनुसार कामाचा पुरेसा अनुभव नसल्याचे दिसून आले. मे. सुप्रीम

इन्फ्रास्ट्रक्चर इंडिया लि. यांनी लूधियाना सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कामाचे अनुभव प्रमाणपत्र सादर केले असून सदर काम हे जॉईट व्हेंचर मध्ये केले आहे. लूधियाना, सार्वजनिक बांधकाम विभागाने दिलेल्या प्रमाणपत्रामध्ये मे.सुप्रीम इन्फ्रास्ट्रक्चर इंडिया लि. यांनी ९०% काम केल्याचे नमूद केले आहे. परंतू प्रस्तूत कामाच्या निविदा तरतूदीनुसार जर कामाच्या अनुभवासंदर्भात सादर केलेले काम हे निविदाकाराने जॉईट व्हेंचर मध्ये केले असेल, तर त्या जॉईट व्हेंचर मध्ये निविदाकारांच्या सहभागाच्या टक्केवारीच्या प्रमाणात येणाऱ्या प्रकल्प किंमतीचाच विचार अर्हतेसाठी करणे क्रमप्राप्त होते. मे.सुप्रीम इन्फ्रास्ट्रक्चर इंडिया लि. यांनी कामाच्या अनुभवासंदर्भात सादर केलेले काम हे तीन कंपन्या मिळून जॉईट व्हेंचर मध्ये केले असल्यामुळे सदर कामामधील त्यांच्या सहभागीत्व टक्केवारीच्या प्रमाणात म्हणजेच फक्त २६% काम अर्हतेच्या अटी करिता विचारात घेणे शक्य असल्याचे व त्यामुळे ते कामाच्या अनुभवासंदर्भातील अर्हतेच्या निकषात बसत नाही.

४.६.२ मे.सुप्रीम इन्फ्रास्ट्रक्चर इंडिया लि. यांना नवी मुंबई मेट्रो प्रकल्पांतर्गत सिडकोने दोन कामे दिलेली होती. मात्र त्यांची कामे संथगतीने होत असल्यामुळे तद्नंतर सिडकोने ही दोन्ही दिलेली कामे रद्द (Terminate) केलेली आहेत. गत ३ वर्षांच्या कालावधीत कोणत्याही Metro Organisation कडून निविदाकाराकडील कामे रद्द केली असल्यास सदर निविदाकार अपात्र ठरतात, अशी अट प्रस्तूत कामांच्या निविदे अंतर्गत असल्यामुळे मे.सुप्रीम इन्फ्रास्ट्रक्चर इंडिया लि. यांची निविदा आवश्यक निकषात बसत नसल्याचे ठरविण्यात आले. मे.सुप्रीम इन्फ्रास्ट्रक्चर इंडिया लि. यांनी सिडको ही Metro Organisation नसल्याचा युक्तिवाद प्राधिकरणाकडे केला आहे. परंतू शासन नगर विकास विभाग यांच्या दिनांक ०६ ऑक्टोबर, २०१० रोजीच्या अधिसूचनेनुसार नवी मुंबई मेट्रो प्रकल्प राबवण्याकरीता सिडकोला प्राधिकृत केले असल्यामुळे "CIDCO is not a Metro Organisation" असे म्हणणे योग्य ठरणार नाही. सद्यस्थितीत प्राधिकरणाअंतर्गत मे.सुप्रीम इन्फ्रास्ट्रक्चर इंडिया लि. यांची तीन कामे सुरू असून या तीनही कामांची प्रगती समाधानकारक नाही व त्यांची आर्थिक परिस्थिती बिकट असल्याचे दिसून येते.

उपरोक्त नमूद कारणांमुळे मे.सुप्रीम इन्फ्रास्ट्रक्चर इंडिया लि.यांची निविदा तांत्रिकदृष्टया पुरेशी प्रतिसादात्मक नसल्याचे (substantially non-responsive) ठरविण्यात आले व पुढील निविदा प्रक्रियेत त्यांना अपात्र ठरविण्यात आले आहे.

४.७ निविदा सादर करण्याच्या अंतिम दिनांकानंतर केंद्र शासनाने दिनांक २५ जानेवारी, २०१८ च्या अधिसूचनेद्वारे मेट्रो बांधकामांकरिता वस्तू व सेवा कराचा दर १८% वरुन १२% असा कमी केला असल्याची बाब महानगर आयुक्त यांनी अवगत केली. त्याचा परिणाम म्हणून निविदाकारांनी सादर केलेला लघुत्तम देकार हा त्या प्रमाणात कमी करण्याची गरज निदर्शनास आणून देण्यात आली. यासंदर्भात उपायुक्त वस्तू व सेवा कर यांच्यासोबत दिनांक २६ फेब्रुवारी, २०१८ रोजी झालेल्या बैठकीत सविस्तरपणे व सर्वांगिण चर्चा करण्यात आली. या चर्चेनुसार उपायुक्त वस्तू व सेवा कर यांच्याकडून यासंदर्भात स्पष्टीकरणात्मक मार्गदर्शन घेण्याचे ठरले. त्यानुसार दिनांक १ मार्च, २०१८ रोजीच्या पत्रान्वये सध्याचा वस्तु व सेवा कर गृहीत धरुन निविदाकारांनी सादर केलेले लघुत्तम देकार, वस्तू व सेवा कराचे दर ६% नी कमी झाल्याने त्याच्या समतुल्य ५.०८ % इतक्या प्रमाणात कमी करणे अपेक्षित असल्याचे कळविले आहे. त्यानुसार देकाराची रक्कम ५.०८% कमी करुन लघुत्तम निविदाकारास स्वीकृति पत्र देण्यात यावे असे प्रस्तावित आहे.

<u>निर्णय :</u> **<u>सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-</u>**

**<u>ठराव क्र. १३४५ :</u>**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्रधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करून कार्यकारी समिती याव्दारे मुं.म.प्र.वि.प्राधिकरणामार्फत मेट्रो मार्ग-२ब प्रकल्पाच्या पॅकेज सी.ए.-०६ साठी मे.एम.बी.झेड व मे. आर.सी.सी. (जे.व्ही.) यांचा सर्व करांसहीत रू. ५२१,२१,२१,१११/- रक्कमेचा मूळ लघुत्तम देकार (अंदाजपत्रकीय किंमतीपेक्षा रु. ४८३.०५४ कोटीच्या ७.९०%

जास्त दराचा), आणि पॅकेज सी.ए.-०७ करीता मे. जी.जी.वाय.एच. बी.सी.एल., मे. निरज सिमेंट स्ट्रक्चरल लि. व मे. पी. के. एच. एस. प्रा. लि. (जे.व्ही.) यांचा सर्व करांसहीत रू.३९३,०१,००,०००/- रक्कमेचा मूळ लघुत्तम देकार (अंदाजपत्रकीय किंमतीपेक्षा रु. ४२०.०८ कोटीच्या ६.४४% कमी दराचा) आर्थिक देकार, वस्तू व सेवा कराच्या किंवा इतर करांच्या दरामध्ये निविदा प्राप्त होण्याच्या दिनांकापासून आतापर्यंत झालेले बदल व कंत्राटीय कालावधीत आणखी बदल झाल्यास कंत्राटीय तरतूदीनुसार कंत्राटीय किंमतीमध्ये वेळोवेळी योग्य ते समायोजन करण्याच्या अधिन राहून, तसेच GST संदर्भात सक्षम प्राधिकरणाच्या प्राप्त अभिप्रायानुसार लघुत्तम निविदाकारांनी सादर केलेल्या मूळ देकारास ५.०८% नी कमी करुन स्विकृती पत्र देण्याच्या कार्यवाहीस मान्यता देण्यात येत आहे. तसेच या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटीप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

"**असाही ठराव करण्यात येतो की,** मे. सुप्रीम इन्फ्रास्ट्रक्चर इंडिया लि. यांच्या याचिकेवर पॅकेज क्र. ०६ संदर्भात उच्च न्यायालयाचा जो आदेश येईल त्याची अंमलबजावणी करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे.

"**आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** निविदेतील तरतूदींनुसार प्रकल्पाच्या पॅकेजेस करीता कंत्राटदारांची नेमणूक इ. पुढील कार्यवाही करण्याकरीता महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.५ : गोरेगाव येथील नियोजित मेट्रो भवनच्या इमारतीसाठी आर्किटेक्चरल, स्थापत्य नियोजन व बांधकाम पर्यवेक्षण इ. कामांसाठी सल्लागाराची नेमणूक करणेबाबत.**

५.१ सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मेट्रो मार्ग २अ, २ब तसेच मेट्रो मार्ग ३ ते मेट्रो मार्ग ७ च्या तपशीलवार प्रकल्प अहवालात मेट्रो भवन व ऑपरेशन कंट्रोल सेंटर (OCC) यासाठी रु.३०० कोटी निधीची तरतुद करण्यात आलेल्या प्रस्तावित इमारतीत मुंबई महानगर प्रदेशातील एकुण १० मेट्रो मार्गांचे ऑपरेशन कंट्रोल सेंटर (OCC) प्रस्तावित करण्यात आले आहे. तसेच, सदरच्या इमारतीच्या निधीची तरतूद असलेल्या तपशिलवार प्रकल्प अहवालांना प्राधिकरणाच्या विविध बैठकीत प्रशासकीय मान्यता देण्यात

आली आहे. मेट्रो भवनच्या प्रस्तावित इमारतीस गोरेगाव (पुर्व) येथील सर्वे क्र. नं. ५८९-अ हा भुखंड राखीव ठेवण्यात आला आहे.

५.२ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने या प्राधिकरणाच्या अखत्यारीत येणाऱ्या मेट्रोच्या विविध कामांसाठी आर्किटेक्ट्सचे Empanelment करण्यासाठी दै. लोकमत व दै. हिंदुस्तान टाईम्स या वृत्तपत्रात अनुक्रमे दिनांक २३ ऑगस्ट, २०१७ व २४ ऑगस्ट, २०१७ रोजी जाहिरात देऊन तसेच प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करून Request for Empanelment (RFE) मागविण्यात आले. त्यास आंतरराष्ट्रीय स्तरावरील खालील एजन्सीजनी प्रस्ताव सादर केले. सदरच्या निविदेत सल्लागाराच्या कामासाठी आर्किटेक्चरल, स्थापत्य नियोजन व संकल्पन, इमारत बांधकामासाठी लागणा-या सर्व आवश्यक मंजुऱ्या, अंदाजपत्रक बनविणे, मसुदा निविदा बनवणे, निविदा प्रक्रिया राबविणे व कंत्राटदार नियुक्ती करणे, बांधकामादरम्यान पर्यवेक्षण व इमारत दोष-दायित्व कालावधीमध्ये पर्यवेक्षण करणे इत्यादी कामे अंतर्भूत केलेली आहेत :-

| Sr.No. | Lead | Consortium |
|---|---|---|
| 1 | Jurong Consultants (India) Pvt. Ltd. Jurong House, 1/5 Palace Road, Bangalore 560001 India | Sole Proprietorship |
| 2 | Archohm Consults Pvt. Ltd.13 Anandlok, New Delhi 110049 India | Benthem Crouwel Architekten Netherlands, General Vetterstraat 61, 1059 BYAmsterdam, Netherlands |
| 3 | Ratan J Batliboi Consultants Pvt. Ltd., 23 Raaj Mahal 1st Floor, 33 Atlamount Road, Mumbai 400 026 | Bental Associates Reality Design Consultants Pvt. Ltd. India, Chakala Andheri (E), Mumbai 400 093 |
| 4 | Team One India Pvt. Ltd.5th floor, Anvils EO Grand sy. No. 135 & 136, near Wipro lake, financial District, Nanakramguda, Hyderabad -500 008 | Perkins Eastman Architects DPC, One Thomas Circle NW suite 200, Washington, DC - 20005 |
| 5 | Veritas Architects SDN BHD, 2nd floor Bangunan Getah Asli, 148 Jalan Ampang, 50450 Kualalumpur, Malaysia | Global Engineering Services, India, 607, Mayuresh Cosmos Plot no. 37, Sector-II C.B.D. Belapur, Navi Mumbai-400614 |
| 6 | Hiten Sethi and Associates, Ground Floor, Yayati CHS, Plot no.9, Sector-58A, Palm Beach Road, Nerul, Navi Mumbai, Maharashtra, India-400706 | Sole Proprietorship |

वर नमूद केलेल्या एजन्सीजचे RFE मध्ये नमूद केलेल्या मार्किंग सिस्टम नुसार छाननी करण्यात आली. त्यामध्ये वरील सहा पैकी चार प्रकल्प सल्लागारांना म्हणजे १) मे. जूरॉंग कंसल्टंट प्रायव्हेट लिमिटेड बेंगलोर, २) आर्कओम कंसल्ट प्रायव्हेट लिमिटेड – बेन्थेम क्रोवेल (जे. व्ही.), ३) रतन जे. बाटलीबोय कंसल्टंट प्रायव्हेट लिमिटेड – बेन्टेल (जे. व्ही.), ४) टीम वन इंडिया प्रायव्हेट लिमिटेड - परकिन्स इस्टमन (जे. व्ही.) प्राधिकरणाच्या Evaluation Committee ने Empanelled Architects for Metro works साठी शिफारस केली. त्यानुसार प्राधिकरणाचे कार्यालयीन आदेश क्र. ०१/२०१७ दिनांक १२ डिसेंबर, २०१७ नुसार वरील चौघांना Empanel करण्यात आलेले आहे.

५.३ महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, गोरेगाव येथील नियोजित मेट्रो भवनच्या इमारतीसाठी आर्किटेक्चरल, स्थापत्य नियोजन व बांधकाम पर्यवेक्षण इत्यादी कामांसाठी सल्लागारांच्या नेमणूकीसाठी प्राधिकरणाने वरील Empanelled Architects कडून ई-निविदेद्वारे विनंती प्रस्ताव (RFP) मागविण्यात आले होते. त्याची ई-निविदा सूचना दिनांक १३ डिसेंबर, २०१७ रोजी प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली. विनंती प्रस्ताव स्वीकरण्याच्या शेवटच्या दिवशी दिनांक ९ जानेवारी, २०१८ पर्यंत तीन सल्लागारांचे प्रस्ताव प्राप्त झाले. (सूची खालील प्रमाणे)

- आर्कओम कंसल्ट प्रायव्हेट लिमिटेड – बेन्थेम क्रोवेल (जे. व्ही.)
- रतन जे. बाटलीबोय कंसल्टंट प्रायव्हेट लिमिटेड – बेन्टेल (जे. व्ही.)
- टीम वन इंडिया प्रायव्हेट लिमिटेड - परकिन्स इस्टमन (जे. व्ही.)

५.४ महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, सविस्तर निविदा सूचनेमध्ये विहित केल्याप्रमाणे पात्रता निकषास अनुसरून ई -लिफाफा 'अ' व 'ब' मध्ये तिन्ही निविदाकारांनी सादर केलेल्या प्रस्तावांची छाननी करण्यात आली. त्यास प्राधिकरणाच्या निविदा शिफारस समितीच्या दिनांक २२ जानेवारी, २०१८ रोजीच्या बैठकीत मंजूरी देण्यात आली. सल्लागारांच्या तांत्रिक प्रस्तावांच्या छाननी नंतरची सुची खालीलप्रमाणे आहे :

| अ. क्र. | सल्लागाराचे नांव | तांत्रिक गुण |
|---|---|---|
| १. | आर्कओम कंसल्ट प्रायव्हेट लिमिटेड – बेन्थेम क्रोवेल (जे. व्ही.) | ८२ |
| २. | रतन जे. बाटलीबोय कंसल्टंट प्रायव्हेट लिमिटेड – बेन्टेल (जे. व्ही.) | ८६ |
| ३. | टीम वन इंडिया प्रायव्हेट लिमिटेड - परकिन्स इस्टमन (जे. व्ही.) | ८७ |

प्रसिद्ध केलेल्या विनंती प्रस्तावातील तरतुदीनुसार ज्या सल्लागारांच्या तांत्रिक प्रस्तावाला कमीत कमी ५० गुण असणा-या सल्लागारांना पात्र ठरविण्यात येईल व त्यानंतर त्यांचे वित्तीय प्रस्ताव उघडण्यात येतील. त्यास अनुसरुन वरील तिन्ही पात्र सल्लागारांचे लिफाफा 'क' (आर्थिक प्रस्ताव) दिनांक २३ जानेवारी, २०१८ रोजी उघडण्यात आले. वित्तीय प्रस्तावामध्ये सल्लागारांनी मागणी केलेले शुल्क खालीलप्रमाणे आहे :-

| अ. क्र. | सल्लागाराचे नांव | एकत्रित नमूद केलेले शुल्क रू. | आर्थिक गुण |
|---|---|---|---|
| १. | आर्कओम कंसल्ट प्रायव्हेट लिमिटेड – बेन्थेम क्रोवेल (जे. व्ही.) | ८,२८,१२,५०० | १००.०० |
| २. | रतन जे. बाटलीबोय कंसल्टंट प्रायव्हेट लिमिटेड – बेन्टेल (जे. व्ही.) | १०,४७,००,००० | ७९.१० |
| ३. | टीम वन इंडिया प्रायव्हेट लिमिटेड - परकिन्स इस्टमन (जे. व्ही.) | ९,५६,२५,००० | ८६.६० |

५.५ त्यानंतर महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, विनंती प्रस्तावास अनुसरून तांत्रिक व आर्थिक गुण संयुक्त करताना तांत्रिक निकषाला ८०% भार व आर्थिक निकषाला २०% भार देण्यात आला.त्याप्रमाणे उघडलेल्या सर्व तांत्रिक आणि आर्थिक प्रस्तावांची छाननी मेट्रो प्रकल्प अंमलबजावणी शाखेमार्फत करण्यात आली व संयुक्त निकष खालील तक्त्यात नमूद करण्यात आले आहेत :-

| अ. क्र. | सल्लागाराचे नांव | तांत्रिक मूल्यमापन | | | आर्थिक मूल्यमापन | | | एकत्रित गुण | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | तांत्रिक गुण | मुल्यांकित गुण (८०% प्रमाणे) | तांत्रिक क्रमांक | आर्थिक देकार (रु. कोटी) | आर्थिक गुण | मुल्यांकित गुण (२०% प्रमाणे) | तांत्रिक + आर्थिक (८०% + २०%) | |
| १. | आर्कओम कंसल्ट प्रायव्हेट लिमिटेड – बेन्थेम क्रोवेल (जे. व्ही.) | ८२ | ६५.६० | तृतीय | ८.२८ | १०० | २० | ८५.६० | द्वितीय |
| २. | रतन जे. बाटलीबोय कंसल्टंट प्रायव्हेट लिमिटेड – बेन्टेल (जे. व्ही.) | ८६ | ६८.८० | व्दितीय | १०.४७ | ७९.१० | १५.८२ | ८४.६२ | तृतीय |
| ३. | टीम वन इंडिया प्रायव्हेट लिमिटेड - परकिन्स इस्टमन (जे. व्ही.) | ८७ | ६९.६० | प्रथम | ९.५६ | ८६.६० | १७.३२ | ८६.९२ | प्रथम |

मे.टीम वन इंडिया प्रायव्हेट लिमिटेड - परकिन्स इस्टमन (जे. व्ही.) यांनी तांत्रिक व आर्थिक एकत्रित मूल्यांकनाच्या क्रमवारीत प्रथम क्रमांक मिळवला असून प्राप्त देकारात सल्लागार मे.टीम वन इंडिया प्रायव्हेट लिमिटेड -परकिन्स इस्टमन (जे. व्ही.) यांचा आर्थिक देकार रू.९.५६ कोटी इतका आहे. त्यानुसार, सदरच्या निविदाकारासोबत झालेल्या वाटाघाटीनुसार अंतिम आर्थिक देकार हा रू.९.३१ कोटी (निविदेच्या अंदाजित किंमतीचा २.९८ %) इतका आहे. मे.टीम वन इंडिया प्रायव्हेट लिमिटेड - परकिन्स इस्टमन (जे. व्ही.) यांनी कतार रेल डेव्हलपमेंट, हैद्राबाद मेट्रो रेल चे मुख्यालय, The Wharf South-West Water front , Houston Main Street Square इत्यादी प्रकल्पांवर काम केलेले आहे. मे.टीम वन इंडिया प्रायव्हेट लिमिटेड - परकिन्स इस्टमन (जे. व्ही.) यांच्या प्रथम गुणप्राप्त निवीदा देकाराची प्राधिकरणाच्या निविदा समितीने दिनांक १४ फेब्रुवारी, २०१८ रोजीच्या बैठकीत शिफारस केलेली आहे.

**निर्णय :** **सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र. १३४६ :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभुत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करून कार्यकारी समिती याद्वारे गोरेगांव येथील मेट्रो भवनच्या नियोजित इमारतीसाठी आर्किटेक्चरल, स्थापत्य नियोजन व संकल्पन, इमारत बांधकामासाठी लागणा-या सर्व आवश्यक मंजु-या, अंदाजपत्रक बनविणे, मसुदा निविदा बनवणे, निविदा प्रक्रिया राबविणे व कंत्राटदार नियुक्ती करणे, बांधकामादरम्यान पर्यवेक्षण व इमारत दोष-दायित्व कालावधीमध्ये पर्यवेक्षण करणे इत्यादी कामांसाठी सल्लागार मे.टीम वन इंडिया प्रायव्हेट लिमिटेड - परकिन्स इस्टमन (जे. व्ही.) यांच्या रू.९.३१ कोटी (निविदेच्या अंदाजपत्रकीय किंमतीच्या २.९८%) इतक्या आर्थिक देकारास मान्यता देण्यात येत आहे. तसेच या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणाऱ्या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**<u>बाब क्र.६ :</u>** **<u>विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत ठाणे बेलापूर रस्ता ते राष्ट्रीय महामार्ग क्र.४ पर्यंतचा रस्ता व बोगद्याच्या कामाच्या लघुत्तम निविदेस मान्यता मिळण्याबाबत.</u>**

६.१ सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई महानगर प्रदेशाचा सर्वांगिण विकास होण्याच्या दृष्टीने विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पाअंतर्गत रस्त्यांची बांधकामे व रुंदीकरण तसेच पुलांची कामे हाती घेण्याचे ठरले व त्यात ऐरोली कटाई नाका या एकूण १२.३ कि.मी. लांबीच्या प्रकल्पाचा अंतर्भाव असून प्राधिकरणाच्या दिनांक २७ जून, २०१४ रोजी झालेल्या १३४ व्या बैठकीत सदर प्रकल्पासाठी एकूण रु. ९४४.२० कोटी इतक्या अंदाजित खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर प्रकल्पाच्या एकूण १२.३ कि.मी. लांबीच्या रस्त्याचे विकसन योग्य प्रकारे होण्याच्या दृष्टीने आखणी मार्ग तीन भागात विभागण्यात आला असून त्यातील भाग क्र. १ जो की ठाणे बेलापूर रस्ता ते राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ असा एकूण ३.५० कि.मी. लांबीचा आहे. सदर भाग-१ मधील उन्नत मार्गाच्या एकूण रॅम्पसहित २३९२ मीटर लांबी असलेल्या व रु. १४४,४७,००,०००/- लघुत्तम दराच्या निविदेस कार्यकारी समितीची मान्यता प्राप्त झाल्यानंतर कार्यारंभाचे आदेश देण्यात आले आहेत. समांतररित्या भाग-१ मधील बोगदा व रस्त्याच्या कामासाठी रु. २५०,२१,६१,१४१/- इतक्या अंदाजित रक्कमेसाठी निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर कामामध्ये पारसिक डोंगरातून जाणा-या १.७० कि.मी. अंतराच्या बोगदयाचा अंतर्भाव असून काम पूर्ण करण्याचा कालावधी ४० महिने (पावसाळयासहित) इतका आहे.

६.२ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, बोगदयाच्या कामासाठी प्रचलित पद्धतीनुसार ई-निविदा मागविण्यात आल्या, त्यास प्रतिसादार्थ एकूण ३ निविदाकारांनी त्यांचे प्रस्ताव सादर केले. सदर निविदाकारांची लिफाफा-ब मध्ये सादर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी केली असता त्या ३ पैकी १ मे. गॅमन इंडिया लि. यांनी त्यांच्या प्रस्तावासोबत सॉल्व्हन्सी सर्टिफिकेट सादर न करता क्रेडिट फॅसिलीटी सर्टिफिकेट जे की निविदेतील स्वरुपानुसार सादर न केल्यामुळे

त्यांचा देकार रद्दबाद ठरविण्यात आला. तद्नंतर दोनच निविदाकारांचे शिल्लक देकार राहिल्याने सदर निविदा प्रक्रिया रद्द करण्यात आली. तद्नंतर दुस-यांदा ई- निविदा दिनांक २८ एप्रिल, २०१७ रोजी वृत्तपत्रात जाहिरात देऊन मागविण्यात आल्या. त्यास प्रतिसादार्थ एकूण ३ निविदाकारांनी त्यांचे देकार सादर केले :-

१) मे. गॅमन इंडिया लि.
२) मे. आय. व्ही. आर. सी. एल. लि. व मे. एस. एम. सी. इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. (जेव्ही)
३) मे. पटेल इंजिनिअरींग लि. व मे. एन. ए. कन्स्ट्रक्शन प्रा. लि. (जेव्ही)

वरील सर्व निविदाकारांना लिफाफा – अ व लिफाफा – ब मधील अटींची पूर्तता केल्यामुळे त्यांचे लिफाफा – क (आर्थिक देकार) दिनांक १६ जून, २०१७ रोजी उघडण्यात आले. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे :-

| अ. क्र. | निविदाकारांचे नाव | आर्थिक देकार रक्कम (रु.) | दराची टक्केवारी | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | मे. गॅमन इंडिया लि. | २४०,२०,७४,६९५.३६ | (-) ४.०० % | तृतीय लघुत्तम |
| २ | मे. आय. व्ही. आर. सी. एल. लि. व मे. एस. एम. सी. इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. (जेव्ही) | २३७,५५,५१,७८७.२७ | (-) ५.०६ % | व्दितीय लघुत्तम |
| ३ | मे. पटेल इंजिनिअरींग लि. व मे. एन. ए. कन्स्ट्रक्शन प्रा. लि. (जेव्ही) | २११,०३,२२,७०६.३२ | (-) १५.६६ % | प्रथम लघुत्तम |

वरील तपशिलानुसार मे. पटेल इंजिनिअरींग लि. व मे. एन. ए. कन्स्ट्रक्शन प्रा. लि. (जेव्ही) यांचा रु. २११,०३,२२,७०६.३२ किंमतीचा आर्थिक देकार जो की, निविदेमध्ये नमुद अंदाजित किंमतीच्या १५.६६% इतक्या कमी दराचा देकार लघुत्तम आढळून आला.

६.३ महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, दरम्यानच्या काळात प्राधिकरणातर्फे काही कारणास्तव मे. एन. ए. कन्स्ट्रक्शन प्रा. लि. यांचेवर दिनांक २७ जुलै, २०१७ च्या आदेशान्वये कार्यवाही करुन त्यांना दिनांक ३१ जानेवारी, २०१८ रोजी पर्यंत प्राधिकरणाच्या कोणत्याही निविदा प्रक्रियेत भाग घेण्यास मज्जाव करण्यात आला. सदर मज्जाव करण्याची प्रक्रिया ही उपरोक्त कामाच्या निविदा प्रक्रियेदरम्यान झाल्यामुळे दिनांक १४ ऑगस्ट, २०१७ रोजी निविदा शिफारस समितीची बैठक घेण्यात आली व सदर बैठकीत ठरल्याप्रमाणे लघुत्तम निविदाकार ज्यांचे सोबत

मे. एन. ए. कन्स्ट्रक्शन प्रा. लि. हे सहभागीदार आहेत त्यांचा प्राप्त झालेला लघुत्तम देकारास मान्यता देता येईल किंवा कसे या बाबत विधी विभागाचा अभिप्राय घेण्याचे ठरले. त्यानुसार विधी विभागाव्दारे महाअधिवक्ता यांचे अभिप्राय घेण्यात आले. प्राप्त झालेल्या अभिप्रायामध्ये मे. पटेल इंजिनिअरींग लि. व मे. एन. ए. कन्स्ट्रक्शन प्रा. लि. (सहभागीदार) यांचा लघुत्तम देकार मे. एन. ए. कन्स्ट्रक्शन प्रा. लि. यांच्यावर झालेल्या कार्यवाहीच्या पार्श्वभूमीनुसार मान्य करणे योग्य होणार नाही असे कळविण्यात आले. तसेच सदर भागीदारीतील मे. पटेल इंजिनिअरींग लि. यांना ते स्वतंत्रपणे निविदा निकष पूर्ण करत असले तरी त्यांच्याबाबत स्वतंत्र विचार करता येणार नाही असे ही अभिप्राय देण्यात आले. सदर अभिप्रायावर व त्यानुसार पुढील कार्यवाही निश्चित करण्याच्या दृष्टीने निविदा शिफारस समितीची दिनांक २६ सप्टेंबर, २०१७ रोजी बैठक घेण्यात आली. सदर बैठकीत महाअधिवक्ता यांचा अहवाल मान्य करण्यात आला.

६.४ महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगीतले की, त्यानंतर उर्वरित दोन देकारातील मे.आय. व्ही. आर. सी. एल. लि. व मे. एस. एम. सी. इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. (जेव्ही) यांचा अंदाजित रक्कमेपेक्षा ५.०६ % कमी इतका देकार हा व्दितीय लघुत्तम आढळून आल्यामुळे त्यांना निविदेप्रक्रिये दरम्यान लागू झालेल्या वस्तु व सेवा कर (GST) च्या पार्श्वभूमीवर चर्चा करण्यासाठी पाचारण करण्यात आले. सदर बैठकीत कंत्राटदारास वस्तु व सेवा कर लागू झाल्यामुळे त्या अनुषंगाने त्यांच्या देकाराबाबत होणा-या संभाव्य परिणामाविषयी विचारणा करण्यात आली असता त्यांच्यातर्फे असा खुलासा करण्यात आला की, बोगद्याच्या कामासाठी सेवा करामधून सुट असून सदर कामासाठी लागणा-या साहित्यांचे (Material) प्रमाण फार कमी असल्यामुळे मुल्यानुसार कर (व्हॅट) हा साधारणत: ३ ते ३.५ % इतक्या प्रमाणात लागू होतो. त्यांनी पुढे असाही खुलासा केला की, सद्य:स्थितीत बोगद्याच्या कामावरील वस्तु व सेवा कर हा १२% असल्यामुळे त्यातून ३ ते ३.५% वगळल्यास साधारणपणे ८.५ ते ९% जादा कराचा बोजा होईल व आम्हास काम करण्याची संधी दिल्यास सदर ८.५ ते ९% करामुळे येणारा अधिक भार सहन करुन निविदेत दिलेल्या दराप्रमाणे म्हणजे ५.०६% अंदाजित रक्कमेपेक्षा कमी या दराने काम पूर्ण करु, जेणे करुन एकूण ८.५ ते ९% दर प्रत्यक्षात प्राधिकरणासाठी कमी होईल. कंत्राटदारांना प्रस्तावित कामाच्या जवळच प्राधिकरणाची इतर दोन कामे मिळाली असल्याने त्यांच्या आस्थापनेवरील होणा-या खर्चातील बचतीमुळे हे शक्य होत असल्याचे त्यांनी नमुद केले.

अशा आशयाचे दिनांक २७ सप्टेंबर, २०१७ रोजीचे पत्र त्यांनी सादर केले. सदर कंत्राटदाराने दिलेला खुलासा लक्षात घेता व मे. आय. व्ही. आर. सी. एल. लि. व मे. एस. एम. सी. इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. (जेव्ही) यांचा देकार जो की, निविदेतील पात्रतेच्या अटी व शर्तीशी सुसंगत असल्यामुळे तसेच कंत्राटदाराने वस्तु व सेवा करामुळे येणारा अधिक भार (सुमारे ८.५ ते ९%) त्यांच्या मुळ देकारामध्ये समाविष्ट करण्यास संमती दर्शविल्यामुळे तसेच त्यांचा देकार जो की, ५.०६% इतका अंदाजित रक्कमेपेक्षा कमी असल्यामुळे निविदा शिफारस समितीद्वारे सदर देकार मंजूर करण्याची शिफारस करण्यात आली. सदर बाबत वित्त विभागाच्या दिनांक १९ सप्टेंबर, २०१७ रोजीच्या परिपत्रकातील मुद्दा क्र. १.३ नुसार बंधपत्र घेण्याचे ठरले व ते त्याप्रमाणे घेण्यात आले.

६.५ त्यानंतर, महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, दरम्यानच्या काळात मे. पटेल इंजिनिअरींग लि. यांनी सदर बाबत न्यायालयात दावा दाखल केला होता त्यावर एकूण ५ वेळा सुनावण्या झाल्या व दिनांक ०७ फेब्रुवारी, २०१८ रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान मे. पटेल इंजिनिअरींग लि. यांचा सदर दावा निकाली काढण्यात आला. निविदाकारांनी दिलेले दर हे निविदेतील अटी नुसार १८० दिवसांपर्यंत वैधत होते. दावा निकाली काढण्यात आल्यांनतर मे. आय. व्ही. आर. सी. एल. लि. व मे. एस. एम. सी. इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. यांनी त्यांनी वाटाघाटी दरम्यान मान्य केलेल्या दराच्या वैधतेबाबत विचारणा केली असता त्यांनी दिनांक १५ फेब्रुवारी, २०१८ रोजीच्या पत्रानुसार त्यांनी मान्य केलेले दर वैध असल्याबाबत कळविले. दावा निकाली काढल्याच्या पार्श्वभूमीवर निविदा शिफारस समितीची बैठक दिनांक २२ फेब्रुवारी, २०१८ रोजी घेण्यात आली व त्यामध्ये दावा दाखल होण्यापूर्वी म्हणजे दिनांक २८ सप्टेंबर, २०१७ रोजी झालेल्या निविदा शिफारस समितीच्या बैठकीत ठरविल्याप्रमाणे मे. आय. व्ही. आर. सी. एल. व मे. एस. एम. सी. इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. (जेव्ही) यांचा ५.०६% इतका अंदाजित रक्कमेपेक्षा कमी असलेला देकार व ज्यामध्ये वस्तु व सेवा करामुळे येणारा अधिक भार त्यांच्या मुळ देकारामध्ये समाविष्ट करण्यास संमती दर्शविल्यामुळे निविदा शिफारस समितीव्दारे, पुन:श्च सदर देकार मंजूर करण्याची शिफारस करण्यात आली.

..३०/-

**निर्णय :** **चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र. १३४७ :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याव्दारे ठाणे बेलापूर मार्ग ते राष्ट्रीय महामार्ग क्र ४ पर्यंतचा रस्ता व बोगदयाच्या प्रस्तावित कामासाठी मे. आय. व्ही. आर. सी. एल. लि. व मे. एस. एम. सी. इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. (जेव्ही) यांच्या अंदाजित रक्कमेपेक्षा ५.०६% कमी दराने ज्यामध्ये जीएसटी लागू झाल्यामुळे होणा-या फेरफाराचा अंतर्भाव आहे असा रु. २३७,५५,५१,७८७.२७ (रुपये दोनशे सदतीस कोटी पंचावन्न लाख एकावन्न हजार सातशे सत्त्यांऐशी आणि सत्तावीस पैसे) चा देकार स्विकारण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटीप्रमाणे देय होणारी भाववाढ इ. अधिदान करण्यास मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.७ :** **पूर्व द्रुतगती महामार्गावरील कोपरी, ठाणे येथील रेल्वे ओलांडणी पुलाचे पोचरस्त्याचे रुंदीकरण व बांधकाम करणे या कामी मागविण्यात आलेल्या निविदेस मंजूरी देणे.**

७.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, प्राधिकरणाच्या दिनांक १९ ऑक्टोबर, २०१६ रोजी झालेल्या १४१व्या बैठकीत विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत पूर्व द्रुतगती महामार्गावरील कोपरी, ठाणे (पूर्व) येथील रेल्वे ओलांडणी पुलाचे रुंदीकरण करणे व परिसरातील वाहतूक सुधारणा प्रकल्पाच्या कामास प्रशासकीय मंजूरी देण्यात आली आहे. सदर कामाची प्रशासकीय मंजूरी रक्कम रु. २५८.७६ कोटी इतकी आहे. ठाणे जवळील पूर्व द्रुतगती महामार्गावर सद्य:स्थितीत महामार्गाच्या ४ + ४

मार्गिका अधिक दोन्ही बाजूस प्रत्येकी ९ मीटरचे सेवा रस्ते उपलब्ध असून कोपरी येथील रेल्वे ओलांडणी पूल मात्र २+२ मार्गिकांचा उपलब्ध आहे. पूर्व द्रुतगती महामार्गावरील वाहतुकीचे प्रमाण फार मोठे असून रेल्वे ओलांडणी पूल मात्र अतिशय कमी क्षमतेचा असल्याने या ठिकाणी मोठया प्रमाणावर वाहतुक कोंडी होते. त्यामुळे या पुलाचे रुंदीकरण तातडीने करण्याची आवश्यकता आहे.

७.२ कामाच्या स्वरुपाबद्दल माहिती देताना महानगर आयुक्त यांनी सांगितले की, सदर कामाच्या सुधारीत आराखडयास रेल्वेमार्फत दिनांक १२ ऑक्टोबर, २०१७ रोजी मंजूरी देण्यात आली आहे. या आराखडयानुसार प्रथम टप्प्यात अस्तित्वातील पुलाच्या दोन्ही बाजूस प्रत्येकी दोन मार्गिकांच्या पुलांचे बांधकाम करण्यात येईल. या नवीन बांधकाम केलेल्या पुलांवरुन वाहतुक सुरु केल्यानंतर दुस-या टप्प्यात अस्तित्वातील पुल तोडून त्या ठिकाणी नविन २+२ मार्गिकांचा पुल बांधण्यात येईल. नवीन पुलांचे बांधकाम रेल्वेच्या मानकांनुसार अस्तित्वातील रेल्वे रुळांच्या पातळीपासून ६.५२५ मी. उंचीवर करण्यात येईल. पुलाच्या दोन्ही बाजूस असलेल्या बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मुख्य जलवाहिन्यांचे स्थलांतरण न करता उपलब्ध जागेत संपूर्ण पुलाचे बांधकाम करण्यात येईल. अंतिमत: नवीन पुल ४+४ मार्गिकांचा असेल.

७.३ या कामात नमुद बाबींची माहिती देताना महानगर आयुक्त यांनी सांगितले की, प्रस्तावित पुलाची पातळी उंचावण्यात येणार असल्याने दोन्ही दिशेंकडील ॲप्रोचेसच्या रस्त्याचा भराव कोसळू नये म्हणुन तात्पुरत्या पॅनल भिंती व शिट पाईलिंग प्रस्तावित करण्यात आले आहे. नौपाडा परिसरास ज्ञानसाधना महाविद्यालयास जोडणारा महामार्गाखालून भूयारी मार्ग प्रस्तावित करण्यात आला आहे. तसेच आनंदनगर येथील अस्तित्वातील वाहनांकरिताच्या भुयारी मार्गावर अतिरिक्त भार येणार असल्याने व तो पेलण्यास सदर भुयारी मार्ग तांत्रिकदृष्टया सक्षम नसल्याने, त्याची पुन:र्बांधणी करण्यात येणार आहे. त्याशिवाय महामार्गावरील पादचारी पुलाचे स्थलांतरण करावे लागणार असल्यामुळे त्याची पुन:र्बांधणी करण्याचा समावेश करण्यात आला आहे.

७.४ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, रेल्वेची सुरक्षा मानके, काम करण्याकरीता रेल्वेकडून मिळणारे ब्लॉक्स तसेच रेल्वे वाहिन्यांची व प्रवाशांची सुरक्षितता या बाबी लक्षात घेऊन या पुलाचे रेल्वे हद्दीतील भागाचे काम रेल्वे विभागामार्फत करण्याकरीता रेल्वेकडे विचारणा

करण्यात आली असता रेल्वेने त्यास सहमती दर्शविली आहे. त्यानुसार रेल्वे हद्दीतील पुलाचे कामाकरीता येणारा अपेक्षित खर्च रु.९० कोटी प्राधिकरणामार्फत रेल्वेकडे जमा करण्यात येईल व सदर काम रेल्वेमार्फत कार्यान्वित करण्यात येईल.

७.५ सदर कामाच्या निविदा प्रक्रिये बाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी नमुद केले की, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राज्य दरसूची वर सुधारीत निविदेय अंदाजपत्रकीय रक्कम रु. १३२,२७,६०,०००/- इतकी आहे. या रक्कमेत जी.एस.टी. कराचा समावेश नसून कंत्राटदारास लागू असणा-या जी.एस.टी. कराचा भार त्याने स्वत: उचलणेबाबत निविदेत नमूद करण्यात आले आहे. निविदेय अंदाजपत्रकीय रकमेत १२% जीएसटीचा बोझा धरल्यास एकूण रक्कम रु. १४८,१४,९१,२००/- इतकी येते. सदर कामाची ई-निविदा; प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर व वर्तमानपत्रात दिनांक २७ सप्टेंबर, २०१७ रोजी प्रसिध्द करण्यात आली. निविदा सादर करण्यासाठी दिनांक २२ डिसेंबर, २०१७ पर्यंत मुदत देण्यात आली होती. निविदा सादर करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत खालील निविदाकारांनी त्यांच्या निविदा सादर केल्या :-

१) मे. जे. कुमार इन्फ्राप्रोजेक्टस लि.

२) मे. रेलकॉन इन्फ्राप्रोजेक्टस लि.

३) मे. एस. एम. सी. इन्फ्रास्ट्रक्चर्स प्रा.लि.

४) मे. जे. एम. सी. प्रोजेक्ट (ई) लि.

प्राप्त निविदांचे ‘अ’ आणि ‘ब’ लिफाफे दिनांक २६ डिसेंबर, २०१७ रोजी उघडण्यात आले. निविदाकारांनी सादर केलेल्या कागदपत्रांची सल्लागारांनी तांत्रिक पडताळणी केली असता सर्व चारही निविदा तांत्रिक दृष्टया पात्र ठरल्या. त्यानुसार, चारही निविदाकारांच्या आर्थिक देकारांचे ‘क’ लिफाफे दिनांक २४ जानेवारी, २०१८ रोजी उघडण्यात आले.

७.६ प्राप्त आर्थिक देकारांची महानगर आयुक्त यांनी पुढीलप्रमाणे माहिती सादर केली :

| अ. क्र. | निविदाकाराचे नाव | सादर केलेला आर्थिक देकार (रु.) (जीएसटी सहीत) | आर्थिक देकाराची टक्केवारी (निविदेय रक्कमेत १२% जीएसटी धरल्यास) |
|---|---|---|---|
| १. | मे. रेलकॉन इन्फ्राप्रोजेक्टस् लि. | १२४,७७,५९,५०८/- | (-) १५.७७% |
| २. | मे.जे.एम.सी. प्रोजेक्ट (इं) लि. | १३४,६१,००,०००/- | (-) ९.१४% |
| ३. | मे.एसएमसी इन्फ्रास्ट्रक्चर्स प्रा.लि. | १४२,५४,०६,०००/- | (-) ३.७८% |
| ४. | मे.जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्टस् लि. | १३१,३१,००,०००/- | (-) ११.३६% |

प्राप्त निविदांमधील मे. रेलकॉन इन्फ्राप्रोजेक्टस् लि. यांनी सादर केलेली रु.१२४,७७,५९,५०८/- ची निविदा लघुत्तम असून सदर देकार हा १२% जीएसटी सहित रक्कम रु. १४८,१४,९१,२००/- पेक्षा १५.७७% कमी दराचा येतो. प्राधिकरणाच्या निविदा समितीच्या दिनांक ०१ फेब्रुवारी, २०१८ रोजी झालेल्या बैठकीत निविदा समितीने सदर प्रकरण कार्यकारी समितीच्या मंजूरीकरीता अग्रेषित करण्याची शिफारस केली असल्याचे महानगर आयुक्त यांनी सांगितले.

७.७ कार्यकारी समितीचे तज्ञ सदस्य डॉ. शिरीष संख्ये यांनी रेल्वे हद्दीतील काम रेल्वे मार्फत करण्याबाबत विचारणा केली असता महानगर आयुक्तांनी सांगितले की, रेल्वे हद्दीतील काम करतांना येणा-या विविध अडचणी जसे की, कामाकरिता आवश्यक ब्लॉक्स, विविध परवानग्या, रेल्वेची मानके, इ. या बाबींमुळे कामांस विलंब होतो असा पुर्वीच्या कामांवरुन अनुभव आहे. मात्र सदर काम रेल्वेमार्फत केल्यास यातील ब-याचशा अडचणी दूर होऊन काम लवकर मार्गी लागते. त्यामुळे कोपरी रेल्वे पुलाचे रेल्वे हद्दीतील काम रेल्वे मार्फत करण्याचा निर्णय घेण्यात आला.

७.८ वरील बाबींचे अवलोकन करुन महानगर आयुक्त यांनी 'पूर्व द्रुतगती महामार्गावरील कोपरी, ठाणे येथील रेल्वे ओलांडणी पुलाचे पोचरस्त्याचे रुंदीकरण व बांधकाम करणे' या कामी

प्राप्त झालेली मे. रेलकॉन इन्फ्राप्रोजेक्टस् लि. यांची रु. १२४,७७,५९,५०८ /- (निविदेय रक्कमेत १२% जीएसटी धरल्यास १५.७७% कमी) रक्कमेची निविदा कार्यकारी समितीच्या मंजूरीसाठी सादर केली.

**<u>निर्णय</u> :** **<u>चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-</u>**

**<u>ठराव क्र. १३४८ :</u>**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत व त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याव्दारे 'पूर्व द्रुतगती महामार्गावरील कोपरी, ठाणे येथील रेल्वे ओलांडणी पुलाचे पोचरस्त्याचे रुंदीकरण व बांधकाम करणे' चे कामी मे. रेलकॉन इन्फ्राप्रोजेक्टस् लि. यांनी सादर केलेली रु. १२४,७७,५९,५०८/- (निविदेय रक्कमेत १२% जीएसटी धरल्यास १५.७७% कमी) रक्कमेची निविदा स्विकारण्यास, प्रत्यक्ष कामानुसार भाववाढ (Escalation) अदा करण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटीप्रमाणे अधिदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**<u>बाब क्र.८ :</u>** **<u>विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील घोडबंदर ते जैसल पार्क (सा.क्र. ०/० ते १/७८० भाग-१) या रस्त्याच्या कामाच्या प्रथम लघुत्तम निविदेस मंजूरी मिळणेबाबत.</u>**

८.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा (Extd.MUIP) प्रकल्पांतर्गत मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील घोडबंदर ते जैसल पार्क या रस्त्याचे कामास सुमारे ८० कोटी इतक्या अंदाजित खर्चाच्या

कामास मा. मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी दिनांक २३ मार्च, २०१६ रोजी मान्यता प्रदान करण्यात आली आहे. सदर रस्ता प्रस्तावित वसई-भाईंदर खाडीपूलासाठी पूरक रस्ता असून राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ वरील वाहतूक पश्चिमेकडील बाजूस जाण्यासाठी पर्यायी रस्ता होईल व मिरा भाईंदरला जाणाऱ्या मुख्य रस्त्यावरील वाहतूकींचा ताण कमी होईल.

८.२ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांच्या सोबत दिनांक ०८ सप्टेंबर, २०१७ रोजी झालेल्या संयुक्त बैठकीमध्ये सा.क्र.०/०० ते १/७८० या भागातील जवळ जवळ सगळी भू-संपादन व पर्यावरणाशी सबंधित प्रक्रिया पूर्ण झालेली असल्याने प्रथम या साखळी कामाच्या निविदा काढण्यात याव्या व उर्वरित ४.९८ कि.मी. (भाग-२) हे काम भू-संपादन, पर्यावरणाची व झाडे तोडण्याची परवानगी मिरा-भाईंदर महानगरपालिकाकडून पूर्ण झाल्यावर हाती घ्यावे असे ठरले.

८.३ महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, सदर कामाकरीता प्रकल्प सल्लागार मे.कम्पोजिट कम्बाइन टेक्नोक्राट्स प्रा. लि. यांनी सदर प्रकल्पाचे रू. ६१.२१ कोटी (वस्तु व सेवा करासह) अंदाजपत्रक सादर केलेले आहे. या कामात ६०.० मी रूंदीचा व १.८० कि. मी. लांबीचा रस्ता (कॉंक्रीटीकरण रू. १२.७६ कोटी व डांबरीकरण रू. २.७० कोटी) त्यामध्ये १०.० मी रूंदीचा आर.सी.सी नाला (रू. २७.०४ कोटी) अंतर्भाव करण्यात आलेला आहे. तसेच सुशोभीकरण, पेव्हर ब्लॉक, साईड गटारे, रोड मार्कींग, साईन बोर्ड, क्रॅश बॅरीअर, रेलींग इत्यादी (रू. १२.११ कोटी) याचा समावेश आहे.

८.४ कार्यकारी समितीचे सदस्य श्री. नितीन करीर, प्रधान सचिव, नगर विकास विभाग यांनी अशी विचारणा केली की १/७८० कि. मी. रस्त्याची किंमत रू. ६१.२१ कोटी (वस्तु व सेवा करासह) इतकी आहे. व एकूण ६.७८ कि. मी. रस्त्याच्या किंमतीला रू. ८०.०० कोटी इतकी प्रशासकीय मान्यता सुरूवातीस दिली आहे. यावर स्पष्टीकरण देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की सदर कामाचा प्रस्ताव सादर करताना लोकप्रतिनीधीमार्फत कामाच्या किंमती पाठविल्या जातात. त्यामुळे कमी किंमतीस प्रशासकीय मान्यता मिळाली. कामाच्या सुधारीत खर्चास प्रशासकीय मान्यता घेण्यात येईल.

८.५ ई-निविदेस प्रतिसाद देऊन खालील निविदाकारांनी ४ निविदा सादर केल्या व चारही निविदाकार पात्र ठरले व त्यांच्या देकाराचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे :-

**निविदेची रक्कम : रु. ६१.२१ कोटी. (वस्तू व सेवा करासह).**

| **अ. क्र.** | **निविदाकारांचे नाव** | **देकाराची रक्कम रु. कोटीत (वस्तू व सेवा करासह)** | **टक्केवारी %** | **शेरा** |
|---|---|---|---|---|
| १. | मे. लॅन्डमार्क कॉर्पोरेशन प्रा. लि. | ५६.८० | ७.२० कमी | द्वितीय लघुत्तम |
| २. | **मे. एन.जी. प्रोजेक्टस् लि.** | **५५.१०** | **९.९९ कमी** | **प्रथम लघुत्तम** |
| ३. | मे. सनराईज स्टोन इन्डस्ट्रीज | ५७.७४ | ५.६७ कमी | तृतीय लघुत्तम |
| ४. | मे. वितराग इन्फ्रा प्रोजेक्टस् लि. | ६०.६० | १.०० कमी | चतूर्थ लघुत्तम |

८.६ महानगर आयुक्त यांनी प्रथम लघुत्तम निविदाकार मे. एन.जी.प्रोजेक्टस् लि. यांची निविदा अंदाजपत्रापेक्षा (-९.९९%) कमी दराची निविदा योग्य असल्याने मान्यतेचा प्रस्ताव सादर केला.

**निर्णय : त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र. १३४९ :-**

**“असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम १२ चे उपकलम (१) चे पोटकलम (ड) व (आय) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण याव्दारे मुंबई महानगर प्रदेशांतर्गत येणा-या विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील घोडबंदर ते जैसल पार्क (सा.क्र. ०/० ते १/७८० भाग-१,) या रस्त्याचे काम करणे या कामाच्या बांधकामाकरीता मे. एन.जी. प्राजेक्टस् लि. यांची लघुत्तम निविदा रक्कम रु. ५५,०९,५९,६८४/- (वस्तू व सेवा कर) (रू. पंच्चावन कोटी नऊ लक्ष एकोणसाठ हजार सहाशे चौऱ्यांशी फक्त) अधिक निविदेनुसार देय होणारी भाववाढ

स्विकारण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही योग्य त्या सर्व फेर बदलांसह करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.९ : विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मुर्धागांव (सुभाषचंद्र बोस मैदान) ते उत्तन गाव (सा.क्र. ०/० ते ३/९००) या रस्त्याचे रुंदीकरण व सुधारणे करणे या कामाच्या प्रथम लघुत्तम निविदेस मंजूरी मिळणेबाबत.**

९.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मुर्धागांव (सुभाषचंद्र बोस मैदान) ते उत्तनगांव या ७.१ कि.मी. रस्त्याच्या कामास मा.मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी दिनांक २३ मार्च, २०१६ रोजी मान्यता प्रदान केलेली आहे. सदर रस्ता मुर्धागांव, राई इ. गावातून जाऊन उत्तन गावात जातो. तसेच सदर रस्ता डोंगरी गावानंतर डाव्या बाजूने गोराईस व मनोरीला जाण्यासाठीचा एकमेव मार्ग आहे.

९.२ महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, महानगर आयुक्त, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण व आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांच्या सोबत दिनांक ०८ सप्टेंबर, २०१७ रोजी झालेल्या संयुक्त बैठकीमध्ये सा.क्र. ०/०० ते ३/९०० या भागातील जवळ जवळ भू-संपादन व पर्यावरणाशी सबंधित प्रक्रिया पूर्ण झालेली असल्याने या साखळी कामाच्या निविदा प्रथमत: काढण्यात याव्या व उर्वरित ३.२०० कि.मी. (भाग २) हे काम भू-संपादन, पर्यावरणाची व झाडे तोडण्याची परवानगी मिरा-भाईंदर महानगरपालिकाकडून पूर्ण झाल्यावर हाती घ्यावे असे ठरले.

९.३ महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, त्यानुसार सदर कामाचे अंदाजपत्रक बनविणे या कामासाठी प्रकल्प सल्लागार मे. कम्पोजिट कम्बाइन टेक्नोक्राट्स प्रा.लि. यांनी सदर प्रकल्पाचे रू. ६५.५५ कोटी (वस्तु व सेवा करासह) अंदाजपत्रक सादर केले. यामध्ये ३०.० मी रूंदीच्या

(३+३ मार्गिका) रस्त्याचे काँक्रीटीकरण, पदपथ, पावसाळी पाणी वाहणारी गटारे, दुभाजक इ. बाबींचा समावेश आहे.

९.४ ई-निविदेस प्रतिसाद देऊन खालील ५ निविदाकारांनी निविदा सादर केल्या व पाचही निविदाकार पात्र ठरले. त्यांच्या देकाराचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे :-

**निविदेची रक्कम : रु. ६५.५५ कोटी. (वस्तू व सेवा करासह)**

| अ. क्र. | निविदाकारांचे नाव | देकाराची रक्कम रु. कोटीत | टक्केवारी % | शेरा |
|---|---|---|---|---|
| १. | मे. बिटकॉन इंडीया इन्फ्रास्टक्चर लि. | ६५.५५ | ०.०० (At Par) दराची | तृतीय लघुतम |
| २. | **मे. नविन मॅरीको इंजि. कं. प्रा. लि.** | **६१.७५** | **५.७९ कमी दराची** | **प्रथम लघुतम** |
| ३. | मे. आर. के. मदानी आणि कं. | ६६.०४ | ०.७६ अधिक दराची | चतूर्थ लघुतम |
| ४. | मे. रेलकॉन इन्फ्रा-प्रोजेक्टस प्रा. लि. | ६१.८३ | ५.६७ कमी दराची | द्वितीय लघुतम |
| ५. | मे. वितराग इन्फ्रा प्रोजेक्टस प्रा. लि. | ६७.०६ | २.३१ अधिक दराची | -- |

९.५ महानगर आयुक्त यांनी प्रथम लघुत्तम निविदाकार मे. नविन मॅरीको इंजिनिअरींग कं. प्रा. लि. यांची निविदा अंदाजपत्रकापेक्षा (-५.७९%) टक्के कमी दराची निविदा योग्य असल्याने मान्यतेचा प्रस्ताव सादर केला.

**निर्णय : त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र. १३५० :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम १२ चे उपकलम (१) चे पोटकलम (ड) व (आय) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण याव्दारे मुंबई महानगर प्रदेशांतर्गत येणा-या विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत

सुविधा प्रकल्पांतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मुर्धागांव (सुभाषचंद्र बोस मैदान) ते उत्तन गाव (सा.क्र. ०/०० ते ३/९००) या रस्त्याचे रूंदीकरण व सुधारणा करणे या कामाच्या बांधकामाकरीता मे. नविन मॅरीको इंजिनिअरींग कं. प्रा. लि. यांची लघुत्तम निविदा रक्कम रु. ६१,७५,५०,६९५/- (वस्तू व सेवा कर) (रू. एकसष्ट कोटी पंचाहत्तर लक्ष पन्नास हजार सहाशे पंच्यान्नव फक्त) अधिक निविदेनुसार देय होणारी भाववाढ स्वीकारण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

“**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही योग्य त्या सर्व फेरबदलांसह करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे.”

**बाब क्र.१० : मेट्रो मार्गाच्या प्रकल्पाच्या अंमलबजावणीकरीता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील मुख्य अभियंता (विद्युत) या पदावरील नेमणूकीस मान्यता देण्याबाबत.**

१०.१ सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मेट्रो प्रकल्पाच्या अंमलबजावणीकरीता निर्माण करण्यात आलेल्या पदांपैकी संचालक (प्रणाली), संचालक (प्रकल्प/कामे) वेतनश्रेणी पीबी ४ रु. ३७४००-६७००० ग्रेड वेतन रु.१००००/- आणि मुख्य अभियंता (रेलपथ), मुख्य अभियंता (संकेत व दूरसंचार) व मुख्य अभियंता (विद्युत) वेतनश्रेणी पीबी ४ रु. ३७४००-६७००० ग्रेड वेतन रु. ८९००/- ही पदे भरण्याकरीता कार्यकारी समितीच्या दिनांक २८ ऑगस्ट, २०१७ रोजी झालेल्या बैठकीतील ठराव क्रमांक २५४ अन्वये पुढीलप्रमाणे निवड समिती गठीत करण्यात आली होती :-

| | | | |
|---|---|---|---|
| १. | महानगर आयुक्त | - | अध्यक्ष |
| २. | अतिरिक्त महानगर आयुक्त | - | सदस्य |
| ३. | महाव्यवस्थापक (मध्य/पश्चिम रेल्वे) | - | सदस्य |
| ४. | संचालक (प्रणाली) मुं.म.रे.कॉ.लि. | - | सदस्य |
| ५. | संचालक (प्रकल्प)-मेट्रो, मुं.म.प्र.वि.प्रा. | - | सदस्य |
| ६. | मुख्य अभियंता, अभियांत्रिकी विभाग | - | सदस्य |
| ७. | उप महानगर आयुक्त (प्रशासन) | - | सदस्य सचिव |

१०.२ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, उपरोक्त ५ पदांपैकी ग्रेड वेतन रु. १००००/- श्रेणीतील संचालक (प्रकल्प/कामे) व संचालक (प्रणाली) ही पदे भरण्याकरीता महाव्यवस्थापक (मध्य/पश्चिम रेल्वे) यांना नामनिर्देशित करण्यात आले होते. मात्र कामाच्या व्यापामुळे आणि व्यस्ततेमुळे मुख्य अभियंता पदाच्या मुलाखती घेणे त्यांना शक्य नसल्याने कार्यकारी समितीच्या मान्यतेच्या अधिन राहून मुख्य अभियंता-विद्युत पदाच्या मुलाखतीसाठी महानगर आयुक्त यांच्या मान्यतेने पुढीलप्रमाणे समिती गठित करण्यात आली होती :-

| | | |
|---|---|---|
| १. | महानगर आयुक्त | - अध्यक्ष |
| २. | अतिरिक्त महानगर आयुक्त | - सदस्य |
| ३. | संचालक (प्रणाली), मुं.मे.रे.कॉ.लि. | - सदस्य |
| ४. | श्री. रवी अग्रवाल, संचालक (तांत्रिक), मुं.रे.वि.कॉ. | - सदस्य |
| ५. | श्री. अशोककुमार, विशेष कार्य अधिकारी (विद्युत), मेट्रो, प्र.अं.शा. | - सदस्य |
| ६. | उप महानगर आयुक्त (प्रशासन) | - सदस्य सचिव |

१०.३ महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, उपरोक्त निवड समितीने मुख्य अभियंता (विद्युत) या पदाच्या सेवाप्रवेश नियमानुसार पात्र ठरविण्यात आलेल्या उमेदवारांच्या मुलाखती घेऊन शैक्षणिक अर्हता, कामाचा अनुभव, पात्रता व योग्यता या सर्व बाबीचा विचार करुन एकमताने "मुख्य अभियंता (विद्युत)" पी.बी.-IV रु.३७४००-६७०००+ ग्रेड पे रु.८९००/- या वेतनश्रेणीतील पदावर श्री. संजय वसंत वाघमारे यांची प्रतिनियुक्तीने नेमणूक करणेची शिफारस केली होती. त्यास अनुसरुन मुख्य अभियंता (विद्युत) वेतनश्रेणी पी.बी.-IV ३७४००-६७००० + ग्रेड पे ८,९००/- या पदावरील नेमणूकीकरीता महानगर आयुक्त यांच्या मान्यतेने वरीलप्रमाणे गठित करण्यात आलेली निवड समिती व सदर निवड समितीने सादर केलेला अहवाल कार्यकारी समितीपुढे कार्योत्तर मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे. तसेच निवड समितीने शिफारस केलेल्या श्री. संजय व. वाघमारे यांच्या प्रतिनियुक्तीने नेमणूकीचा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

..४१/-

<u>निर्णय :</u> <u>त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-</u>

<u>ठराव क्र. १३५१ :-</u>

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ (३) (एक) च्या अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याद्वारे मुख्य अभियंता (विद्युत) या पदावर नेमणूक करणेकरीता गठीत करण्यात आलेल्या निवड समितीस कार्योत्तर मंजूरी देत आहे. तसेच मुख्य अभियंता (विद्युत) पी.बी.-IV रु. ३७४००-६७००० + ग्रेड पे ८,९००/- या वेतनश्रेणीतील पदावर निवड करण्यात आलेल्या समितीच्या अहवालास व सदर पदावर श्री. संजय वसंत वाघमारे यांची प्रतिनियुक्तीने नेमणूक करण्यास मंजूरी देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** सदर ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**<u>बाब क्र.११ :</u> <u>मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणासाठी अत्याधुनिक पध्दतीची कार्यालयीन इमारत व निवासी इमारत बांधणे.</u>**
**<u>- मंजूर निविदेवरील वाढीव खर्चास व अतिरिक्त बाबी तसेच इमारतीसाठी आवश्यक असलेल्या फर्निचर, विद्युतीकरण, उदवाहने व वातानुकुलीत यंत्रणा इ. सेवाविषयक एकत्रित कामांसाठी प्राधिकरणाकडून सुधारीत प्रशासकीय मान्यता मिळणेसाठी शिफारस करणेबाबत.</u>**

११.१ या प्रस्तावाबाबत महानगर आयुक्त यांनी बाब टिपणीची क्रमश: सविस्तर माहिती समितीस दिली. महानगर आयुक्त यांनी असे विषद केले की, सदर प्रस्तावातील मूळ स्थापत्य कामांच्या मंजुर निविदा रक्कमेत (रु.४८.९१ कोटी) झालेल्या वाढीव व्याप्तींमुळे रु.७८.७४ कोटी इतक्या सुधारित अंदाजपत्रकास मंजूरी मिळणेस्तव बाब टिप्पणी कार्यकारी समितीच्या दिनांक १० जुलै, २०१२ रोजी झालेल्या २३४व्या बैठकीत ठेवण्यात आली होती. त्यावर कार्यकारी समितीने वाढीव खर्चास तसेच अतिरिक्त बाबीस मंजूरी देण्यापूर्वी या सर्व बाबी कशाप्रकारे उद्भवल्या व इमारत पूर्ण करण्याच्या दृष्टीने कोणत्या उपाययोजना करणे क्रमप्राप्त ठरल्या या सर्व बाबी

तपासण्याकरीता कार्यकारी समितीचे सदस्य, श्री. ना. वि. मेराणी यांची एक सदस्यीय समिती नियुक्ती केली. त्याअनुषंगाने मेराणी समितीने प्रकल्पाची पाहणी केली, तसेच कार्यालयीन दस्ताऐवजावरुन वाढीव व अतिरिक्त बाबी कशा उद्‌भवल्या यांची सविस्तर तपासणी केली.

११.२ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, मेराणी समितीने सुचविल्याप्रमाणे मूळ निविदेतील वाढीव व्याप्ती व्यतिरिक्त कार्यालयीन इमारतीच्या इतर कामांबाबत (बाहय दर्शनी कामे, अंतर्गत स्थापत्य कामे, उद्वाहनांची कामे, विद्युत, वातानूकुलित यंत्रणा व अंतर्गत सजावटींची कामे इ.) एकत्रितपणे कार्यान्वयाची कार्यवाही पूर्ण करुन कार्यालयीन इमारतीची एकूण किंमत रु. ११५.५४ कोटी (निविदा अटी व शर्तीनुसार देय असणा-या भाववाढीसह) इतकी असून, निवासी इमारतीची किंमत रु. १७.६५ कोटी इतकी आहे. त्याप्रमाणे दोन्ही इमारतीची एकूण किंमत रु. १३३.२० कोटी इतकी आहे. निवासी इमारतीचे बांधकाम माहे मे, २०१० मध्ये पूर्ण झाले व कार्यालयीन इमारतीचे काम माहे डिसेंबर, २०१५ मध्ये पूर्ण झाले आहे. इमारतीचा प्रत्यक्षपणे वापर माहे जानेवारी, २०१६ पासून सुरु झालेला आहे.

११.३ महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, सदर प्रस्ताव हा कार्यकारी समितीच्या दिनांक २० सप्टेंबर, २०१६, दिनांक २६ मे, २०१७ व दिनांक २८ ऑगस्ट, २०१७ रोजी झालेल्या अनुक्रमे २५०, २५३ व २५४व्या बैठकीत मान्यतेस्तव सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावावर सविस्तर चर्चा सुध्दा झाली होती. दिनांक २० सप्टेंबर, २०१६ रोजी झालेल्या २५०व्या बैठकीत झालेल्या सविस्तर चर्चेअंती, मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी निर्देशित केले की, मेराणी समितीचा अहवाल सीलबंद पाकिटात कार्यकारी समितीच्या सर्व सदस्य/निमंत्रित यांना माहितीसाठी पाठवून त्यावर त्यांचे मत घ्यावे व सदर बाब पुढील कार्यकारी समितीच्या बैठकित अंतिम निर्णयासाठी फेरसादर करावी. त्यानुसार दिनांक २५ ऑक्टोबर, २०१६ रोजी महानगर आयुक्त यांच्या स्वाक्षरीने दिनांक ०७ ऑगस्ट, २०१२ रोजीचा मेराणी समिती अहवाल कार्यकारी समितीच्या सर्व सदस्यांना सीलबंद पाकिटात पाठविण्यात आला व त्यावर सदस्यांचे मत प्राधिकरणाकडे पाठविण्यात यावे अशी विनंती केली. तद्‌नंतर दिनांक ११ जानेवारी, २०१७ रोजी सदर विषयाबाबत सर्व सदस्यांना स्मरणपत्रे पाठविण्यात आली. परंतु सदस्यांचे मत प्राधिकरणास प्राप्त झाले नाही. ही बाब महानगर आयुक्तांनी समितीच्या निदर्शनास आणली.

११.४ महानगर आयुक्त यांनी सदर प्रकल्पाच्या वास्तुविशारद व प्रकल्प सल्लागार यांच्या बाबत माहिती देताना सांगितले की, सल्लागाराचे मूळ शुल्क रु. ७०.३२ लक्ष (म्हणजेच ०.९% वास्तुविशारद पोटी व ०.९% प्रकल्प सल्लागारापोटी) इतके होते. मेराणी समितीने त्यांचे अहवालात सल्लागाराचे शुल्क मूळ निविदा किंमतीच्या आधारावरच सिमित करावे असे सूचविले होते. परंतु सुरुवातीस निवासी इमारतीच्या संपूर्ण बांधकामाकरीता व कार्यालयीन इमारतीचा केवळ सांगाडा उभारणीच्या कामाकरीता निविदा मागवून प्रत्यक्ष बांधकाम माहे मार्च, २००८ मध्ये सुरु करण्यात आले. कार्यालयीन इमारतीकरीता लागणा-या इतर बाबींसाठी म्हणजे बाहय दर्शनी भागाचे काम, अंतर्गत स्थापत्य व उद्वाहनाचे काम, अंतर्गत सजावटीचे काम, विदयुतीकरणाचे काम, वातानुकूलित यंत्रणेसंबंधीचे काम इ. कामे टप्याटप्याने सक्षम प्राधिका-याची मंजूरी घेऊन निविदा मागविण्यात आल्या. याकरीता बराच कालावधी लागला. तसेच वरील सर्व बाबींची व्याप्ती सल्लागारास वास्तुविशारद व प्रकल्प सल्लागार या नात्याने पूर्ण करण्याचे त्यांच्या कंत्राटात नमूद होते. त्याबरोबरच इमारतीचे भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त करण्याची जबाबदारी सल्लागाराचीच होती. सबब सल्लागाराच्या मूळ शुल्कात कामांच्या मूळ निविदांच्या किंमतीत वाढ झाल्यामुळे तसेच कंत्राटातील तरतूदीनुसार सल्लागारास वाढीव कालावधीकरीता देय असलेल्या वाढीमुळे सल्लागाराच्या शुल्कात वाढ झालेली आहे. यास्तव, श्री. तांबे, माजी सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांची एक सदस्यीय समिती नेमण्यात आली. समितीने सल्लागारास नेमून दिलेल्या कामांचा व प्रकल्पाच्या कामांचा वाव यांचा सविस्तरपणे अभ्यास केला. समितीने वास्तुविशारद व प्रकल्प सल्लागार यांचे मूळ शुल्क व प्रकल्पाच्या वाढीव व्याप्तीमुळे प्रकल्प सल्लागारास वाढीव कालावधीकरीता प्रतीमाह शुल्क देण्याबाबतची शिफारस अहवालानुसार केलेली आहे. सदर अहवालानुसार सल्लागारास माहे डिसेंबर, २०१५ अखेरपर्यंत रु. ५.११ कोटी इतके शुल्क अदा करण्यात आलेले आहे. तांबे समितीच्या अहवालातील शिफारशीनुसार प्रकल्प सल्लागारास माहे मार्च, २०१६ अखेरपर्यंत एकूण रु. ५.६९ कोटी इतके शुल्क अदा करावे लागेल. परंतु सल्लागाराने एकूण रु. १७.५६ कोटी इतके शुल्क मिळणेबाबत मागणी केलेली आहे असे समितीच्या निदर्शनास महानगर आयुक्तांनी आणले. तथापि सल्लागाराने मागणी केलेली रक्कम / शुल्क ही रास्त / समर्थनीय नसल्याचे महानगर आयुक्तांनी स्पष्ट केले. तसेच कार्यकारी समितीने निर्देशित केल्याप्रमाणे प्रकल्पाच्या संरचनेत करावे लागलेले बदल हे प्रकल्प

सल्लागाराच्या कामातील उणिवांमुळे आहेत किंवा कसे याबाबत तांबे समितीचा अंतिम अहवाल अपेक्षित आहे. अंतिम अहवाल प्राप्त झाल्यानंतर समितीच्या शिफारशीनुसार पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल असे महानगर आयुक्त यांनी सांगितले. त्यावर मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी निर्देशित केले की, मेराणी समितीच्या अहवालात नमूद केले असले तरी, कामास लागणारा एकूण कालावधी व व्याप्तीचा विचार करता सल्लागाराचे एकूण शुल्क हे तांबे समितीने शिफारस केल्याप्रमाणे म्हणजेच रु.५.६९ कोटीवरच सिमित/मर्यादित करावे.

११.५ महानगर आयुक्त यांनी मेराणी समितीच्या अहवालातील एकूण १ ते १२ तांत्रिक मुद्यांची पूर्तता झाल्याचे समितीच्या निदर्शनास आणले. त्यावर समितीने सर्व मुद्यांच्या पूर्ततेस्तव सादर केलेल्या शिफारसीची नोंद घेतली.

११.६ महानगर आयुक्तांनी समितीच्या निदर्शनास असेही आणले की, इमारतीचे मूळ कामाचे ठेकेदार (मे.रेलकॉन इन्फ्राप्रोजेक्टस लि.) यांना तांत्रिक समितीने शिफारस केलेल्या काही अतिरिक्त बाबींचे दर मान्य नाहीत. सदर मान्य नसलेल्या बाबींची एकूण अंदाजित किंमत रक्कम रु.२.६५ कोटी इतकी असून या रक्कमेचा मूळ निविदेच्या सुधारित किंमतीत (म्हणजेच रु.७५.३० कोटीत) समावेश नाही. परंतु ठेकेदाराने दिनांक ०३ मे, २०१७ रोजीच्या पत्रान्वये रु.२.६५ कोटी व्यतिरीक्त रु.७.१७ कोटी अशी एकूण रु.९.८२ कोटी इतकी रक्कम वादग्रस्त बाबी (Disputed Item/Amount) म्हणून सादर केलेली आहे. सदर बाबीपैकी सुमारे रु.३.६५ कोटी इतकी रक्कम ठेकेदाराने निविदा व अटी शर्तीनुसार त्यांना देय असणा-या भाववाढीबाबत मागणी केलेली आहे. परंतु मेराणी समितीने त्यांच्या अहवालात शिफारस केल्याप्रमाणे व अनुपालन अहवालात नमूद केल्याप्रमाणे मुळ कामाच्या कंत्राटदारास दिनांक १५ मे, २०११ रोजीच्या नंतर तसेच इतर दोन कामाच्या कंत्राटदारास मुळ निविदा कालावधी नंतर भाववाढ देण्याचे नाकारले आहे. तथापि सदर बाबी बाबत निविदेतील अटी व शर्तीनुसार कार्यवाही प्रगतीपथावर आहे. कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर सदर बाब स्वतंत्रपणे महानगर आयुक्त यांच्या मान्यतेकरीता प्रस्तावित करण्यात येईल. त्यापैकी रु.२.६५ कोटी इतक्या रकमेची तरतुद इमारतीच्या एकूण किंमतीत जमेस धरुन प्रस्तावित आहे. अंतिम रक्कम ही अन्य समितीच्या शिफारशीस अधिन राहून महानगर आयुक्तांच्या अंतिम मान्यतेनेच अदा करण्यात येईल असे महानगर आयुक्तांनी सांगितले.

..४५/-

११.७ चर्चेदरम्यान कार्यकारी समितीचे सदस्य श्री. नितीन करीर, प्रधान सचिव, नगर विकास विभाग यांनी विषद केले की, सदर कार्यालयीन इमारतीच्या वेगवेगळया भागांच्या कार्यन्वयनाकरीता तत्कालीन अति. महानगर आयुक्त व महानगर आयुक्त यांचे पूर्व मान्यतेने निविदा मागविण्यात आल्या ही बाब मुळात गंभीर स्वरुपाची आहे. सबब मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी निर्देशित केले की, यापुढे अशा प्रकारे एकाच कामाचे वेगवेगळे भाग करुन निविदा मागवू नये, याची प्राधिकरणाने दक्षता घ्यावी.

**निर्णय :** **चर्चेअंती, बाब टिपणीतील प्रस्ताव मेराणी समितीच्या अहवालातील शिफारशी तसेच मेराणी समितीने उपस्थितीत केलेल्या मुद्यांचे अनुपालन/ पूर्तता झाल्याचे नोंद घेऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र. १३५२ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास कारणीभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समितीस याद्वारे, वांद्रे-कुर्ला संकुलाच्या 'ई' ब्लॉकमधील प्राधिकरणाच्या निवासी इमारत पूर्ण व कार्यालयीन इमारत सांगाडा बांधकामाचा सुधारित खर्च रु.७५.३० कोटी, हा स्विकृत निविदा रक्कमेपेक्षा (रु.४८.९१ कोटी) ५३.९५% इतका अधिक (म्हणजेच रु.२६.३९ कोटी) असल्याने त्यास कार्यकारी समिती याद्वारे मंजूरी देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** तांबे समितीने शिफारस केल्याप्रमाणे प्रकल्प सल्लागाराचे एकूण शुल्क सिमित करुन रु.५.६९ कोटी इतक्या रक्कमेस कार्यकारी समिती याद्वारे मंजूरी देत आहे.

**"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** कार्यालयीन इमारत पूर्ण करण्याकरीता कराव्या लागलेल्या इतर ४ कामांसाठी लागलेला एकूण सुधारीत खर्च रु.५७.८९ कोटी तसेच प्रकल्प सल्लागाराचे शुल्क रु. ५.६९ कोटी मिळून प्रकल्पाची एकूण किंमत रु. १३८.८८ कोटी इतक्या किंमतीस कार्योत्तर सुधारित प्रशासकीय मान्यता प्राधिकरणाकडून घेण्यास कार्यकारी समिती याद्वारे शिफारस करीत आहे.

**"आणखी असाही ठराव करण्यात येत आहे की,** तांत्रिक समितीने शिफारशी केल्याप्रमाणे काही अतिरिक्त बाबींचे दर मे.रेलकॉन इन्फ्राप्रोजेक्टस लि., मुंबई या मूळ इमारत बांधकामाच्या ठेकेदारास मान्य नसल्याने त्याकरीता लागणारी अंदाजे रक्कम रु.२.६५ कोटी दयावी लागल्यास अशा अतिरिक्त रकमेची तरतूद मान्य करुन सदर रक्कम अन्य समितीच्या शिफारशीस अधिन राहून महानगर आयुक्तांच्या अंतिम मान्यतेने अदा करण्यास कार्यकारी समिती याद्वारे मान्यता देत आहे.

**"पुढे असा ठराव करण्यात येत आहे की,** भविष्यात अशा प्रकारे एकाच कामाचे वेगवेगळे भाग करुन निविदा बोलवू नये, याची प्राधिकरणाने दक्षता घ्यावी.

**"पुढे असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील सर्व ठरावांची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**<u>बाब क्र.१२ : महामंडळे / प्राधिकरणे / बोर्ड यांच्याकडील अतिरिक्त निधी राज्य विकास रोख्यांमध्ये गुंतवणूक करण्याबाबत.</u>**

१२.१ प्राधिकरणाकडील गुंतवणूक राज्य विकास रोख्यामध्ये करण्याच्या पर्यायावर बैठकीत सविस्तर चर्चा झाली. चर्चेअंती, कार्यकारी समितीने वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे सविस्तर मार्गदर्शक सूचना व निर्देश येईपर्यंत सदर प्रस्तावास स्थगिती दिली.

**बाब क्र.१३ : प्राधिकरणाकडील असलेला अतिरिक्त निधीचा गुंतवणूक अहवाल - दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१७ ते ३१ डिसेंबर, २०१७**

१३.१ महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाने दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१७ ते ३१ डिसेंबर, २०१७ हया कालावधीत केलेल्या गुंतवणूकीची माहिती दिली. कार्यकारी समितीने दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१७ ते ३१ डिसेंबर, २०१७ हया कालावधीत केलेल्या गुंतवणूक अहवालाची नोंद घेतली.

**निर्णय : सदरहू गुंतवणूकीच्या अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.**

**<u>बाब क्र.१४ :</u> <u>पूर्व द्रुतगती महामार्गावरील छेडा नगर जंक्शन, घाटकोपर (पूर्व) येथे वाहतूक सुधारणा प्रकल्प राबविणेचे कामी मागविण्यात आलेल्या निविदेस मंजूरी देणे</u>**

१४.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, सांताक्रुझ चेंबूर जोडरस्ता व पुर्व मुक्तमार्ग या दोन्ही रस्त्यांवरील वाहतुक पूर्व द्रुतगती महामार्गास घाटकोपर (पूर्व) येथील छेडा नगर जंक्शन येथे मिळून त्यानंतर ठाणे व नवी मुंबई दिशेकडे वेगळी होते. त्यामुळे छेडा नगर जंक्शन येथे वाहतुकीची मोठया प्रमाणावर कोंडी होत आहे. तसेच अस्तित्वातील छेडा नगर उड्डाणपुलावरुन सांताक्रुझ चेंबुर जोडरस्त्याकडे जाणारी वाहने आणि मानखुर्द/नवी मुंबई कडून येऊन महामार्गाकडे वळणारी वाहने यांची छेडा नगर उड्डाणपुलाचा शेवट व अमर महल उड्डाणपुलाची सुरुवात यातील सुमारे १०० मीटरच्या भागात सरमिसळ होत असल्याने येथे अपघातप्रवण क्षेत्र निर्माण झाले आहे. छेडा नगर जंक्शन येथील वाहतुक कोंडी सोडविण्यासाठी प्राधिकरणामार्फत याठिकाणी पुढील कामे प्रस्तावित करण्यात आली असल्याचे महानगर आयुक्त यांनी सांगितले :-

अ. सायन-ठाणे दिशेकडील वाहतुकीसाठी अस्तित्वातील उड्डाणपुलाशेजारी समांतर तीन मार्गिकांचा अतिरीक्त उड्डाणपुल बांधणे. या पुलाची लांबी ६८० मीटर असुन रुंदी १२ मीटर असेल.

ब. मानखुर्द-ठाणे दिशेकडील वाहतुकीसाठी दुस-या पातळीवर उड्डाणपुल बांधणे. या पुलाची लांबी १२४० मीटर तर रुंदी ८.५० मीटर असेल.

क. अस्तित्वातील छेडा नगर उड्डाणपुलास अमर महल उड्डाणपुलास जोडण्यासाठी स्वतंत्र उन्नत मार्गिका बांधणे. या उन्नतमार्गिकेची लांबी ६५० मीटर तर रुंदी ८.५० मीटर असेल.

ङ गरोडीया नगर येथील अस्तित्वातील भुयारी मार्ग महामार्गावर ठाणे दिशेकडे कामराज नगर येथे स्थलांतरीत करणे.

या सर्व कामांचा एकत्रित खर्च रु. २४९.२९ कोटी इतका असुन या अंदाजित रकमेस प्राधिकरणाच्या दिनांक २६ मार्च, २०१५ रोजी झालेल्या १३७व्या बैठकीत प्रशासकीय मंजूरी देण्यात आली असल्याचे महानगर आयुक्त यांनी सांगितले.

१४.२ या प्रकल्पाच्या निविदा प्रक्रियेबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी सांगितले की, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन २०१७-१८ च्या दरसूचीवर आधारीत या कामाची सुधारीत

निविदेय अंदाजपत्रकीय रक्कम रु. २०५,९५,३९,०००/- इतकी आहे. सदर कामाच्या ई-निविदा; प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर व वर्तमानपत्रात दिनांक ०५ ऑक्टोबर, २०१७ रोजी प्रसिध्द करण्यात आली. या रक्कमेत जी.एस.टी. कराचा समावेश नसून कंत्राटदारास लागू असणा-या जी.एस.टी. कराचा भार त्याने स्वत: उचलणेबाबत निविदेत नमूद करण्यात आले आहे. निविदेय अंदाजपत्रकीय रक्कमेत १२% जीएसटीसह बोझा धरल्यास एकूण रक्कम रु. २३०,६६,८३,६८०/- इतकी येते. निविदा सादर करण्यासाठी दिनांक १९ डिसेंबर, २०१७ पर्यंत मुदत देण्यात आली होती. निविदा सादर करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत खालील निविदाकारांनी त्यांच्या निविदा सादर केल्या :-

१) मे.जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्टस लि.
२) मे. एन.सी.सी. लि.
३) मे.जे.एम.सी. प्रोजेक्ट (ई) लि.

प्राप्त निविदांचे 'अ' आणि 'ब' लिफाफे दिनांक २१ डिसेंबर, २०१७ रोजी उघडण्यात आले. निविदाकारांनी सादर केलेल्या कागदपत्रांची सल्लागारांसह तांत्रिक पडताळणी केली असता सर्व तिन्ही निविदा तांत्रिक दृष्टया पात्र ठरल्या. त्यानुसार, तिन्ही निविदाकारांच्या आर्थिक देकारांचे 'क' लिफाफे दिनांक २८ फेब्रुवारी, २०१८ रोजी उघडण्यात आले. प्राप्त आर्थिक देकारांची माहिती महानगर आयुक्त यांनी पुढील प्रमाणे सादर केली :-

| अ. क्र. | निविदाकारांचे नाव | सादर केलेला आर्थिक देकार (रु.) (जीएसटी सहीत) | आर्थिक देकाराची टक्केवारी (निविदेय रक्कमेत १२% जीएसटी धरल्यास) |
|---|---|---|---|
| १. | मे.जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्टस लि. | २२४,३५,००,०००/- | (-)२.७४% |
| २. | मे. एन.सी.सी. लि. | २३४,७०,००,०००/- | (+)१.७५% |
| ३. | मे.जे.एम.सी. प्रोजेक्ट (इं) लि. | २३९,६५,००,०००/- | (+)३.८९% |

प्राप्त निविदांमधील मे. जे. कुमार इन्फ्राप्रोजेक्टस लि. यांनी सादर केलेली रु. २२४,३५,००,०००/- ची निविदा लघुत्तम असून सदर देकार हा १२% जीएसटी बोझा सह रक्कम रु. २३०,६६,८३,६८०/- पेक्षा २.७४% कमी दराचा येतो.

१४.३ महानगर आयुक्त यांनी निदर्शनास आणले की, प्राधिकरणाच्या निविदा समितीच्या दिनांक ०१ मार्च, २०१८ रोजी झालेल्या बैठकीत निविदा समितीने लघुत्तम निविदाकार मे.जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्टस लि. यांना वाटाघाटी करुन त्यांचे आर्थिक देकार कमी करण्याचे निर्देश दिले. यानुसार निविदाकारास कळविले असता मे.जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्टस लि. यांनी त्यांचा देकार रास्त असला तरीही विनंतीस मान देऊन देकार रु. ५०,००,०००/- ने कमी करण्यास सहमती दर्शविली. यानुसार मे.जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्टस लि. यांचा अंतिम आर्थिक देकार रु.२२३,८५,००,०००/- इतका असुन तो १२% जीएसटी बोझा सह रक्कम रु. २३०,६६,८३,६८०/- पेक्षा २.९६% कमी दराचा येतो. निविदा समितीच्या दिनांक ०१ मार्च, २०१८ रोजी झालेल्या बैठकीत निविदा समितीने सदर प्रकरण कार्यकारी समितीच्या मंजूरीकरीता अग्रेषित करण्याची शिफारस केली.

वरील बाबींचे अवलोकन करुन महानगर आयुक्त यांनी "पूर्व द्रुतगती महामार्गावरील छेडा नगर जंक्शन, घाटकोपर (पूर्व) येथे वाहतूक सुधारणा प्रकल्प राबविणेचे" कामी प्राप्त झालेली मे.जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्टस लि. यांची रु. २२३,८५,००,०००/- रक्कमेची (निविदेय रक्कमेत १२% जीएसटी धरल्यास २.९६% कमी दराची) निविदा कार्यकारी समितीच्या मंजूरीसाठी सादर केली.

**<u>निर्णय</u> :** <u>त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला</u> :-

**<u>ठराव क्र. १३५३ :</u>**

"**असा ठराव करण्यात येत आहे की**, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत व त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याव्दारे 'पूर्व द्रुतगती महामार्गावरील छेडा नगर जंक्शन, घाटकोपर (पूर्व) येथे वाहतूक सुधारणा प्रकल्प राबविणेचे कामी प्राप्त झालेली मे.जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्टस लि. यांची रु.२२३,८५,००,०००/- रक्कमेची (निविदेय रक्कमेत १२% जीएसटी धरल्यास २.९६% कमी दराची) निविदा स्विकारण्यास, प्रत्यक्ष कामानुसार संभाव्य भाववाढ (Escalation) अदा करण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटीप्रमाणे अधिदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

त्यानंतर, मा.अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त करण्यात आले.

**********